साहामाही ,, ३ ,, ८
साळअखेर ,, ५ ,, १८
किरकोळ अंकास ........................ ४

Annum in arrears] 7 ,, 1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy.............................4as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ..........०१

Advertisemen
Below 10 lines... 2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL. XXVII AKOLA MONDAY 5 JUNE 1893 NO. 22

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख ५ माहे जून सन १८९३ इ० अंक २२

## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक

( दुनियेंचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूंतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सुदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळलें. शारीरीक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणें, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गूण आला आहे. शरिर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें ताबडतोब नाहींशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुरूप गुरूप इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, बिचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेंत सलका नारप्या तसेंच पाटींत दुखणें बेंबीचेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्र शय यांची आग होणें लवकी पांढरि होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारिरीक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक मात्रानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारे टॅानिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्मांच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जेंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हे औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूंची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clements ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधागिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक' नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणिं दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कॅंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बाळंटाईन को; स्मिथ, स्टानिस्टिट को, बेनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकान.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.

### NOTICE

It is hereby notified that with a view to encouraging the use of Warora coal the Resident has sanctioned the following system.

Firms and others who have ordered coal will pay the price into the Treasury on an ordinary chellan taking a receipt from the Treasury Officer.

Dated Akola 19th. May 1893. (Sd.) J. G. Morris Deputy Commissioner Akola District

### जाहिरात.

लोकांस कळविण्यांत येत आहे किं वर्धा येथील कोळशाचा सर्व लोकांस सुलभ रीतीनें उपयोग करितां यावा ह्मणून आलिशान रेसिडेन्ट साहेब बहादूर हैद्राबाद यांच्या हुकुमा अन्वयें वर्धा येथील कोळशाच्या खाणीतून जे लोक कोळसा विकत घेतील त्याची किंमत ह्या जिल्ह्यांतील कोणत्याही सरकारी खजिन्यांत भरली असतां ती घेतली जाईल व भरण्याची पावती देण्यांत येईल.

आकोला ता. १९ मे सन १८९३ (Sd.) J. G. Morris डेपुटी क०

### नोटीस

दामु वलद रामजी फाटे वस्ती चांगेफळ बु॥ ता. जळगांव, गुंजी मर्द गणपती राहणें वस्ती सौंदळ ता० अकोट व भोनी मर्द सोनाजी कसुरकर वस्ती वडसिंगी ता० जळगांव सोनी मर्द भिवसन हिवरकर वस्ती अकोली बुद्रुक ता० जळगांव यांसः—

नोटीस देणार अजी मर्द तुकाराम फाटे वस्ती चांगेफळ बुद्रु० ता० जळगांव इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मा पैकीं दामु व गुंजी व भोनी असें मिळून वऱ्हाडसमाचार अकोलें ता० २२।५।९३ इ० चे अंकांत ता० १८ माहे मे सन १८९३ इ० ची नोटीस दिली त्याचें उत्तरः—

तुह्मी नोटीस दिली ती सर्व खोटी आहे. माझा नवरा तुकाराम हा मयत झाला त्यास पुत्र संतान नाहीं. मी फक्त विधवा वारीस आहे. तुह्मा पैकीं दामु हा भाऊबंद असून विभक्त पूर्वी पासून आहे व गुंजी व भोनी व सोनी ह्या तुकारामच्या बहिणी आहेत परंतु हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें मी योग्य वारीस असतां बहिणीचा किंवा भाऊबंदाचा हक्क बिलकूल नाहीं. मी जिवंत आहे तों पावेतों माझा वारसा आहे. सर्व जिनगीवर माझा पूर्ण हक्क आहे. इतर कोणाचा वारसा नाहीं. जंगममाल आहे तो बैल २ म्हैस १ असे आहे. माझे अंगावर जे डागिने आहेत ते नवऱ्याचे हातचे नसून माझे मातोश्रीचे व भावाचे दिलेले आहे करितां ते स्त्री धन आहे व माझे सासूचे अंगावरील मुळींच डागिनें नाहींत. तुकाराम व सासू जिवंत असतांना हिस्से झाले आहेत. मयत तुकाराम झाल्यावर माझे कडेस मुळींच आले नाहीं. शेतांतील मालाबद्दल मी किस्तगारी करून उत्पन्न केलें तें पोटास लागलें आहे. मी जिवंत असतां कोणाचा वारसा नाहीं. विनाकारण नोटीस दिलेवरून जबाब देणें प्राप्त झाल्याबद्दल खर्च लागला तो आज आज पासून १५ दिवसांत पाठऊन द्यावें. न दिल्यास रिती प्रमाणें योग्य तजवीज केली जाईल. कळावें ता० मजकूर.

मी विधवा स्त्री असल्यामुळें तुह्मी विनाकारण माझे घरावर चढून येऊन मजला त्रास देतां व शेतांत जाऊन खळ्याचे आड आल्यावरून कळविते कीं, विनाकारण त्रास देऊ नये. दिल्यास योग्य तजवीज तुमची करणें मजला भाग पडेल.

( सही. )
निशाणी बांगडी अजी मर्द तुकाराम फाटे वस्ती मौजे चांगेफळ बुद्रु० ता. जळगांव.

### पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि. मी वऱ्हाडांत प्रवास करीत असतांना प्रखर उन्हाळ्यामुळें फार अस्वस्थ झालो. या प्रांतांतील माथेरान ह्मणजे बुलढाणा असें ऐकत होतो ह्मणून तिकडेच निघालो. घाटावर आल्या बरोबर मला बरें वाटूं लागलें आणि लोकवस्तींत आल्या बरोबर मनास जास्तच आनंद वाटला. एका धर्मशाळेत बिऱ्हाड लाविलें व गांव पहाण्यास निघालो. ह्या ठिकाणीं प्रथम चटकरशी लक्ष्यांत येण्यासारखी गोष्ट ही आहे कीं ह्या स्थळीं वृद्ध स्त्री पुरुष फार क्वचित दृष्टीस पडतात. जिकडे जावें तिकडे तरणी बांड मंडळी दृष्टीस पडते. दुकानांत जा, अगर एखाद्या कारखान्यांत जा, आफिसांत जा, अगर कचेरींत जा; सर्वत्र तरुणजन दृष्टीस पडतात आणि इंद्रभुवन ( Garden of the Hurries ) वगैरे काल्पनिक स्थलांची आठवण होते व परमेश्वरानें ही इहलोकीं 'तरुण भूमि'च तर निर्माण केली नाहींना! असा क्षणभर भ्रम पडतो. असो, ह्याचें इंगित काय असावें ह्याचा उलगडा करणें आपल्या वरच सोपवून मी आपल्या पुढील कथनास लागतो. सडका लांबलचक असून प्रशस्त आहेत रात्रंदिवस वारा सारखा सोसाट्याचा वाहत असतो, आणि त्यामुळें आरंभीं नवीन मनुष्यांस फार त्रास वाटतो. जिकडे जावें तिकडे सडका स्वच्छ झाडलेल्या दिसतात आणि पंचमहातत्वें ह्या ठिकाणीं मनुष्य सेवेंत दक्ष ह्मणून तयारच आहेत असें वाटतें. गावाच्या सभोंवार एक लांबलचक खोऱ्याचा वळसा आहे आणि तीं सर्व खोरीं मिळून संरक्षणार्थ एक ईश्वर निर्मित खंदकच आहेसें भासतें. ह्या पैकीं कित्येक तर इतकीं खोल आहेत कीं वरून दगड फेंकला असतां तो तळा पर्यन्त सिंह गर्जना करीत जातो. ह्यापैकीं एका खोऱ्यांत पाणी साठवून ठेऊन ते बाफेच्या साह्यानें गांवांत आणिलें आहे. पर्जन्यकाळीं हीं खोरीं अतिशय उग्र स्वरूप धारण करितात परंतु वसंतांत फार सौम्य व आल्हादजनक वाटतात. अशा ठिकाणीं भर दोन प्रहरीं देखील वाळ्याच्या ताट्या लाविलेल्या एखाद्या बंगल्यात थंड नसेल इतके थंड साधारण झाडाच्या छायेंत वाटतें व त्या गर्द झाडींतून वाहणाऱ्या उदकांचा झुळझुळ

किरेक महत्वाचे नवीन शोध वेड्यांनीं लावले आहेत.

आगकाड्यांच्या कारखान्यांमध्यें एक यंत्र असतें, तें एका दिवसांत १,००,००,००० काड्या कापून जुळवून ठेवितें.

वाटर्लूच्या लढाईंत असणारे ८ असामी अद्याप फ्रान्स देशांत आहेत. नांवुवंतच हे!

कापडांच्या चिंध्या सोडा घालून उकळ-ल्या असतां त्यांपासून टिपकागद तयार होतो.

लंडन शहरांत एका दिवसांत येणाऱ्या व जाणाऱ्या गाड्यांची संख्या ७०,००० आहे.

या देशांत अशी एक कावळ्याची जात आहे कीं, त्याचा आवाज मनुष्याच्या मोठ्यानें हंसण्या सारखा असतो.

जंगली कबूतर दर तासांत ९० मैल उडून जातें.

एक टन पोलादा पासून १४,४०,००० टांक तयार होतात.

ग्रीस देशांतील पापदळाला दगड मारायाला शिकवीत असत.

जंगली हत्तीला शत्रूचा वास १,००० यार्डावरून येतो.

नायगरचा धबधबा १५० फूट उंचीवरून पडतो.

सर्पाचें काळीज डोक्यांत असतें, ह्मणून त्यावर मारल्या बरोबर तो मरतो.

इजिप्त देशांतील अतिशय उंच मनोऱ्याची उंची ४३८ फूट आहे. करमणूक.

अमेरिकेंत ४०४७ गृहस्थ लक्षाधीश आहेत.

कलकत्यास सिटी कालेजामध्यें मुके व बहिरे यांचा एक वर्ग सुरू करण्यांत आला आहे.

शेतकीची सुधारणा करण्याकरितां शेतकीच्या पेढ्या स्थापण्याचा आमचे सरकार विचार करीत आहे अशी बातमी आहे.

मुक्ती फौजेस ८० हजार रुपये मदत देण्याचा सरकारचा ठराव झाला आहे कां?

लंडनचा परीघ ७०० चौरस मैल आहे.

पोस्टाचे टिकिटांवर स्टांप किंवा रेघा मारणें व्यापाऱ्यांची चाल आहे, परंतु तसें करूं नये असा पोस्ट खात्याचा ठराव होत आहे. न्या. सु.

मद्रास सरकारच्या शिलकेंतून १७॥ लक्ष रुपये हिंदुस्थान सरकाराकडे मागितले व मद्रास सरकारांनीं ते दिले.

फ्रान्स देशांतील एक वर्तमानपत्र कांचेच्या ठशानीं छापत आहे.

हिंदुस्थानांत १५ वर्षांखालील शिकत असलेल्या मुलींची संख्या ३८०००० आहे. न्या० सिं०

---

नोटीस

रा. रा. भाऊजी वा॥ वाकू पाटील राहणार नायगांव परगणें चांदूर तालुके मलकापूर यांस नोटीस देणार दवलत वा॥ विठोबा पाटील राहणार तरोडे बुद्रुख तालुके परगणे जळगांव नोटिशीनें असें कळवितो कीं तुह्मी आह्मां पासून रुपये दोनशे (२००) तारण शेतीचा हिस्सा तिकोडीचा आणे ८ आठचा देऊन व दर शेकडा व्याज १।४ एक रुपया चार आणेचा करार करून देऊन रुपये दोनशे (२००) कर्ज घेतलें व हे रुपये व्याजा सुद्धां एक वर्षानी देणेचा करार होता. त्यास आज पावेतो करारा पेक्षां दीडवर्ष ज्यास्त जाहालें सदरहु दस्तऐवज (२००) रुपयेचा कायद्या प्रमाणें रजिस्टर करून घेतला आहे तुह्मांस आह्मी रुपये दोनशे (२००) च्यार पांचवेळा मागितले परंतु तुह्मी दिले नाहींत. आतां आह्मांस रुपये ठेवणेची सोय नाहीं याजकरितां तुह्मांस या नोटिशीनें असे कळविलें जातेकीं नोटिस पावल्या पासून पंधरा दिवसांचे आंत सदरहु रुपये (२००)शे मुद्दल व याचे लगाईंत मिती पासून आज पावेतो व्याज असे मिळून आणून देउन निकाल करावा. असे जाहले नाहींतर रिती प्रमाणें फिर्याद करून अखेर निकाल होई पर्यंत जो खर्च वगैरे होईल तो ह्या नोटिशीचा खर्च असे सर्व भरून घेतले जाईल. ह्मणून ही नोटीस सही ता २९ माहे मे सन १८९३ इ.

सही दवलत वल्द विठोबा पाटील
राहणार तरोडे बुद्रुख
तालुके जळगांव
दस्तुर खुद्द.

---

नोटीस

राजश्री देविदास जमनादास साहु दुकान विहिगांव तालुका खामगांव यांस.

राजमहमद वल्द शेखटिपु राहणार मौजे अटाळी तालुके खामगांव यांजकडून देण्यांत येतेकीं, मजला तुह्मी २५० अडीचशें रुपये देण्याचें कबूल केलें वरून मी अडीचशें रुपयाचें स्टांप तुह्मास देण्या करितां घेऊन आलो त्यास तुह्मी १५० रुपयांचा दस्तऐवज मजकडून लिहून, घेतला त्याजमधें पूर्वीची तुह्मी खातेबाकी कांहीं दर्शवून बाकी रोख देण्याचें असें मिळून सदर्हू दस्तैवज मजकडून आपण लिहून घेतला व १०० रुपयांचा आणलेला दस्तैवज आपण लिहून घेतला नाहीं व सदर्हू १५०रुपयांचा दस्तैवजापैकीं मजला तुह्मी १२रुपये रोख दिले व बाकीचे रुपये दिले नाहीं यास्तव आपणांस नोटिशीनें कळवितो कीं मजपासून कपटानें आपण दस्तऐवज करून घेतला मजला स्वतः लिहितां येत नसून मी अडाणी आहे. तुमची खाते बाकी प्रथमची कोणत्या सालांत मी घेतली त्या दिवसापासून हिशेब वगैरे कांहींच समजून दिला नाहीं आणि मी गरजवंत असल्या कारणानें तुह्मास दस्तऐवज करून दिला. तुह्मी जर सदर्हू दस्तऐवजावरून दावा कराल तर मी जबाबदार नाहीं कारण तुह्मी विश्वास देऊन दस्तऐवज करून घेतला आहे. सदर्हू बोलणे माझे झाल्यावरून आपण मला रुपये दिले नाहींत. या वरून मी मौजे अटाळी येथील देशमुख मे. बशरोद्दीन व बळवंतराव पाडे या उभयतांस तुमचे दुकानावर घेऊन आलों तरी तुह्मी मागीलचा हिशेब मजला दाखविला नसून रुपये ही दिले नाहींत आणि दस्तऐवज ठेवून घेतला वरून तुह्मास नोटीस देण्यांत येते कीं मी दिलेला दस्तऐवज १५ दिवसांचे आंत माझा मला वापस करावा. नाहींपेक्षां ह्या दस्तऐवजावरून तुह्मी कांहीं दिवस ठेवून पुढें दावा कराल तर मी याचा जबाबदार अगदीं नाहीं कारण तुह्मी कपटानें दस्तऐवज ठेवला आहे. कळावें. तारीख ३० माहे मे सन १८९३ इ०

(सही)

सहीची निशाणी कट्यार राजमहमद वल्द सेख टिपु राहनार मौजे आटाळी ता. खामगांव.

---

नोटीस

रा. रामचंद्र लालचंद साहू दुकान खामगांव यांसः—

खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं, आमचे तुह्माकडून खालीं लिहिल्या प्रमाणें येणें आहे. व ज्या कृत्यांनीं आम्हास तुह्मी नुकसानीची रकम भरून देण्यास पात्र झाला आहा त्याचा तपशीलः—

३२८४= खामगांव येथें नदीवरील आमच्या जुन्या दुकाना आहेत यापैकीं पूर्वे कडील दुकान १ व नवी दुकान १ आणि बैठक १ वर रस्त्याचा बंगला, व दुकानचे मागील जागा त्यांत असलेले कोठडीसह याचें भाडें दरसाल १२५ प्रमाणें साडे एकतीस महिन्याचें.

२८२॥ बगीचा एक चावडी नजीकचा यांत असलेली जागा व बखार वगैरे आमचे हक्काची याचें भाडें दर साल १०० रुपये प्रमाणें साडे एकतीस महिन्याचें.

३८७॥ जी दुकान तुह्मास भाड्यांनीं दिली त्याचे शेजारी आमची आवारांतील जागा आह्मी तुह्मास कोणासही भाड्यानीं देऊन टाकून भाडें जमा करावें यासाठीं सोंपली होती, ही तुह्मी कोणास भाड्यानीं न देतां आपलें स्वतःचें कामास वापरून उपभोग घेतला. याचें भाड्याचें नुकसानीबद्दल रुपये दरसाल १५० प्रमाणें एकतीस महिन्याचा आकार.

४६।॥= सदरील जागेचे शेजारी हिरालाल यांस दिलेली जागा त्यानीं सोडल्या पासून आमचे परवानगी वाचून तुह्मी वापरून भाड्याची नुकसानी केली त्या नुकसानीचा आकार दरसाल ७५ प्रमाणें साडे सात महिन्याचे.

६०० दुकानचे पिछाडी आमची बखार होती तिजवर तुह्मास देखरेख ठेवण्यास सांगितलें होतें त्यांतील लाकडे आणि दुसरें सामान तुह्मी आमचे परवानगी वाचून आणून आपले उपयोगास लाविलें त्याचें नुकसानी बद्दल.

८९७ वरील दुकाना, जागा, बगीचा वगैरे या शिवाय दुसऱ्या दुकाना आह्मी इतर लोकांस भाड्यानीं दिल्या होत्या त्याचा पैसा तुमचे दुकानीं सदरील इसमाकडून आला व जमा झाला ते रुपये अंदाज.

---

२१४२

या सर्व रकमेचे रीतिप्रमाणें आजवर होईल तें व्याज, अशा रकमा तुह्माकडून येणें असोन याचा उलगडा करावा व भाड्यानीं घेतलेली वगैरे जागा खालीं करून द्यावी अशा बद्दल तुह्मास अनेक वेळ सुचना झाल्या असतां त्या प्रमाणें तुह्मी वर्तन केलें नाहीं यासाठीं या नोटिशीनें कळविण्याचा प्रसंग आल्या अन्वयें कळविण्यांत येतें कीं, ही पावल्या पासून आठ दिवसांत वर दाखविलेल्या रकमेचा व्याजसह उलगडा करून आमची पावती घ्यावी. त्याच प्रमाणें तुह्माकडे भाड्यानीं असलेली दुकान, बगीचा व या शिवाय तुह्मास सोंपलेली जागा आणि तुह्मी बीन हक्कानीं वापरता त्या सह ज्या आमच्या जागा आहेत त्या खाली करून आमचे तब्यांत द्याव्या. या प्रमाणें न केल्यास तसें होण्यासाठीं जे कायदेशीर इलाज ते केले जातील त्या बद्दल तुह्मास खर्च सोसावा लागून ताबा मिळण्यास जो अवकाश लागेल त्या अवकाशा मुळें आणि त्या शिवाय इतर गोष्टी बद्दल तुमचे करण्यानीं जी नुकसानी होईल ती सर्व प्रकारची भरून देण्यास तुह्मास पात्र व्हावें लागेल कळावें ता० २९-५-९३

(सही मारवाडींत.)
चुनीलाल गणेश लाल मालक
दुकान मोतीराम लछीराम
नांदेड दस्तूर हरगोविंद
धूत दस्तुर खुद्द.

---

नोटीस

रा. रा. गंगासा ब्राह्मण राहणार खामगांव यांस—

खालीं सही करणार यांजकडून नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं नदीवरच्या दुकानच्या पिछाडीची कोठडी खाली होती ती आमच्या परवानगी वाचून तुह्मी आपले कबेस घेतली त्यास ३१ महिनें झाले तर त्या बद्दलचे भाडें दरमहा ४ चार रुपये प्रमाणें १२४ रुपये झालें ते आठ दिवसांचे आंत आमचे दुकानावर देऊन आमचे सहीची रसीद घ्यावी. आणि ही नोटीस पावल्या तारखेसच आमची कोठडी खाली करून द्यावी. कोठडी खाली न केली तर फिर्यादीने ताबा घेई पर्यंत त्या मुदतीचे भाडे तुह्मावर दररोज आठ आणे प्रमाणें आकारलें जाईल. रुपये १२४ न दिल्यास या नोटीशीच्या खर्चा सुद्धां कोर्ट मार्फत भरून घेतलें जातील. कळावे. तारीख २९ मे १८९३ इसवी.

(सही मारवाडींत)
चुनीलाल गणेशलाल मालक दुकान मोतीराम लछमीराम
नांदेड दस्तूर हरगोविंद धूत दस्तूर खुद्द.

---

जाहिरात.

सर्वत्र लोकांस या जाहिरातीने दवलत वा॥ विठोबा पाटील राहणार तरोडे बुद्रुख परगणें व तालुके जळगांव असे जाहिर करतात कीं ता २२ माहे मे सन १८९३ रोजीं आह्मी नायगाव येथें चुनीलाल मारवाडी याच्याकडे व इतर कांहीं कामा करिता आह्मी गेलो होतो व मजबरोबर कांहीं कागदपत्र दस्तऐवज वगैरे घेऊन गेलो होतो. त्या कागदांत भाऊजी वा॥ वाकू पाटील नायगांवकर यांणी मजपासून रुपये [ २०० ] कर्ज घेऊन तारण तिकोडीचा शेतीचा आठ आणेचा हिस्सा लिहून देऊन व रुपये दर शेकडा दरर्ष (१।४) व्याज अशा करारानें रुपये दिलेला रजिस्टर केलेला दस्तऐवज नाहींसा झाला आहे तर सदर्हू गहाण दस्तऐवज कोणास सापडला असल्यास आणून द्यावा तर त्याजबद्दल आह्मी इनाम रुपये वीस देऊं ह्मणून दिली जाहिरात सही. ता २९ माहे मे सन १८९३ इसवी.

(सही) दवलत वल्द विठोबा पाटील
राहणार तरोडे तालुका जळगांव
दस्तूर खुद्द.

---

☞ हें पत्र आकोले येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

..हा माही " ३ " ८८
साळअखेर " ७ " १८८
किरकोळ अंकास ........................ ४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०।१

Annum in arrears ... 3 as
Six monthly............3 " 8 as
Single copy.............................4as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

Advertisement
Below 10 lines... 2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

VOL. XXVII | AKOLA MONDAY 12 JUNE 1893 | NO. 23

वर्ष २७ | आकोला सोमवार तारीख १२ माहे जून सन १८९३ इ० | अंक २३

## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय तो एकच खात्रीचें औषधि आहे. तिच्या योगें मज्जूंतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतील थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्पास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरीक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उवड्या हवेंत राहणें, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गूण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें ताबडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झाल्यीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, बिचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासिनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेंत सलका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अन्यत्र तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरि होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारिरीक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक मात्रानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारे टॉनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा- कित्येक कुकर्मांच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जोंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालू असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हे औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूंची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clements.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधगिरी ठेवावी, आणि जे नकलीं औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक' नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणिं दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—केंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्टिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकान.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.

### नोटीस

आकोला ता ६।६।९३

मदारखा मयतवारीस पुनलाखा वा मदारखा राहणार कजबे पिंपळगांवराजा नोटीस देण्यांत येतेकीं तुमचेकडे आमची दुकानची बाकी येणें आहे तिची मुदत पुरी झाली करता नोटीस देण्यांत येतेकीं आजपासून आठ दिवसांचे आंत रुपये घेऊन यावे नाहीं तर आह्मी तुमचेवर फिर्याद कोर्ट खुले होतांच करुं सही.

बाबुरावजी सखारामजी तर्फे
मु. गोविंद अंताजी.

### नोटीस

रा. रा. बल्देव हरबक्स मारवाडी दुकान मौजे अगर तालुके अकोलें यास.

नोटीस देणार मालक बाबुरावजी सखारामजी देशमुख नोटीस देण्यात येतेकीं तुह्मी मंडाळे येथील सखाराम वा कुकाजी चो जमीन भाड्यानें वहितीस केली आहे त्या जमिनीवर आमचा हूकूम नामा झाला असून जप्त केली आहे तर तुह्मी ती जमीन करुं नये. ही नोटीस.

बाबुरावजी सखारामजी तर्फे मु. गोविंदराव.

### नोटिस

रा. रा. पांडुरंग गोविंद वकील राहणार आकोलें यांस —

खाली सही करणार याज कडून देण्यांत येते कीं सन १८९२।९३ सालचा कलालीचा मक्ता ता. मोर्तीजापुर येथीलचा तुमचे चुलतबंधु. रा. रा. आनंदासपंत यांचे नावावर तुमचे आमचे संमतीनें घेतला तो मक्ता तुह्मी दुसऱ्यास ११०० अकराशे रुपये नफ्यानें दिला. सालीम मक्त्यांत आमचा हिस्सा ०४ च्यार आणेचा आहे. त्या हिशाबद्दल आह्मी तुह्मास नफ्याचे रुपये मागितले त्यास तुह्मी मार्च अखेर देणेचे कबूल केलें. परंतु त्यानंतर दोन वेळा सदरहु रुपयेची मागणी केली परंतु रुपये मिळाले नाहींत याजकरितां निरुपाय होऊन नोटिस देणें भाग पडले तर नोटिस पावल्या पासून ८ आठ दिवसांत रुपये देऊन निकाल करावा असें झालें नाहीं तर ह्या नोटिशीच्या खर्चा सह कोर्ट खर्च सुद्धां सर्व रुपये भरून घेऊं ह्मणून दिली नोटिस सही ता. ७।६।९३ इसवी.

सही
मारोती हिवसाजी दुकान आकोलें
दस्तुर खुद्द.

### नोटिस.

राजमान्य राजश्री सखाराम सारंगा शेटे मयत वारीस पुत्र सिताराम सखारामशेट राहणार पिंपळगांव राजा तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणे यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे वडिलांस आमचे पिंपळगांव राजा येथील इनाम जमीन खालसा झालेली व धानवही वगैरे बद्दल कुलमुखत्यारपत्र देऊन कुलमुक्त्यार नेमलें होतें त्यास देवाज्ञा होण्यास आजमास दोन वर्षे झालीं या दोन वर्षांच्या अवकाशांत तुह्मी आह्मास कांहींच कळविलें नाहीं याज कारितां तुह्मास या नोटिसीनें असें कळविलें जातें कीं सदरहू मुक्त्यारपत्राची व्यवस्था मयत झाल्यामुळें अनायासेंच रद्द झाली आहे व आह्मीही ह्या लेखानें मुक्त्यारपत्र रद्द केलें आहे. तर ही नोटिस पावतांच मुक्त्यारपत्र दिलें तारखे पासून आजपावेतों शेती वगैरे बद्दलचा सर्व हिशेब दाखवून आमचे रुपये हिशेबानें जे निघतील ते देऊन पावती घ्यावी. व शेती गहाणें वगैरे आमची आमचे ताब्यांत द्यावे. असें केलें नाहीं तर रीति प्रमाणें तजवीज करून अखेर निकाल होई पर्यंत या नोटीशीचे खर्चीसह सर्व नुकसान भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस कळावें तारीख ६ माहे जून सन १८९३ इ०

सही
सदाशिव रामचंद्र माहाजन उर्फ दाजी
साहेब वर्धेकर तर्फे कुलमुक्त्यार
गोविंद अंताजी चितळे
दस्तुर खुद्द.

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

वाशीम तारीख १।६।९३.

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांस—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. रोहिणि नक्षत्राचा प्रवेश झाल्यापासून नेहमीं आकाश ढगांनीं भरलेलें असतें मधून मधून पाऊस पडतो हवा अगदीं खराब झाली आहे. पावसाळा अगदीं सुरूं झाल्याचा भास होतो. पाणी आणि चारा यांची सालमजकुरी विपुलता असून फक्त अन्नाचीच महगता आहे. रोगराइ नाहीं आंबे सालमजकुरी नाहींच म्हटलें तरी चालेल.

मेची सुटी संपून मास्तर लोक आपले कामावर रुजूं झाले. विद्या शिकण्याच्या कामीं लोकांना जितका उल्हास पाहिजे तितका दिसत नाहीं कारण शिकलेल्या लोकांना उत्तेजन मिळत नाहीं. नववी, आठवी, सातवी व सहावी ह्या इयत्ता शिकून मुलें गांवांत फिरतात. कोठें नोकरी मागण्यास गेलीं तर त्यांची कोणी दाद घेत नाहीं. वशिला असल्या ह्मणजे शहाणपण नको, विद्या नको, परीक्षा नको, कांहीं नको. मला वाटतें ह्या जिल्ह्यांत अशा प्रकारचीं उदाहरणें बरींच सांपडतील. विद्या नोकरी करितांच शिकूं नाहीं असें ह्मणणें सोंप आहे परंतु आजकाल जितके ह्मणून लोक शिकत आहेत तितक्या पैकीं प्रत्येकास जर विचारलें तर विद्या शिकण्याचें कारण नोकरी करून पोट भरावें हाच उद्देश आहे असें सांगेल. मनाची स्थीति सुधारून मोक्षसाधन मिळवावें असा ह्मणणारा मनुष्य मला वाटेंत क्वचितच मिळेल. वास्तविक पहातां शाळाखात्याच्या अधिकाऱ्यांनीं या गोष्टीकडे लक्ष घालून वऱ्हाडांतील सर्व खात्यांत शाळा खात्यांत तयार झालेले लोक घेत जावेत अशी मनापासून खटपट केली पाहिजे. आईबाप आपल्या मुलांना वाढवून पुढें त्यांची व्यवस्था लावून देतात. त्याच प्रमाणें शाळाखातें मुलांच्या पितृस्थानीं असून त्या खात्यानें जर कांहीं दाद न लाविली तर कोणाच्या तोंडाकडे पहावें हें समजत नाहीं. अमूक एक इयत्ता झाली ह्मणजे अमुक पर्यंत नोकरी द्यावी व त्या प्रमाणें अमलवारी होते किंवा नाहीं हें

ही पाहिलें पाहिजे. हा विषय महत्वाचा आहे याची हेळसांड करणें चांगलें नाहीं. याचा परिणाम शाळाखात्यावर घडेल. शाळाखातें सुधारत चाललें आहे असें रिपोर्टांतून नेहमीं असतें. मला वाटतें पाय सुजला म्हणजे जशी शरीराची खरी सुधारणा नाहीं त्याच प्रमाणें स्थीति आहे ही सुधारणा डेर्यारिकूइल सारखी एखाद्यास वाटेल.

मि. हेअर साहेब डे. क. हे म्युनिसिपालिटीचे चेअरमन झाल्यापासून म्युनिसिपालीटिच्या नोकर लोकांत व मेंबर जे हुशार आहेत त्यांत अधिक हुशारी येत चालली आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. साहेब बहादुरांचें ह्या कामीं अतिशयच लक्ष आहे. पुष्कळ वेळां ते प्रातःकाळीं गांवांत येतात. जिकडे तिकडे फिरून स्वच्छता व इतर प्रकार याच्याकडे अतिशय लक्ष देतात. व जेणेंकरून ह्या संस्थेचें हित होईल तें ते करीत असतात. म्युनिसिपालिटिचे सेक्रेटरी मि. शेषराव रघुनाथ वकील हे आपलें काम मनापासून करितात. स्वतः गांवांत फिरतात. जीं कामें चाललेलीं असतात तीं पहातात. सेक्रेटरी व चेअरमन यांचें लक्ष चांगलें असल्यामुळें सध्यां व्यवस्था चांगली चालली आहे.

आपला

"क्ष"

---

# वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ट वद्य १३ शके १८१५

सिव्हील सर्व्हिसची परीक्षा विलायतेस होते त्याच वेळीं इंडियांतही घेतली जावी अशी मि. पाल यांनीं पार्लमेंटांत सूचना आणिली आणि कर्मधर्म संयोगानें ७६ मतें विरूद्ध पण ८४ मतें अनुकूळ मिळून ती सूचना बहुमतानें पसार झाली. या सूचनेवर मतें घेण्या पूर्वीं प्रधान मंडळी कडूनही प्रतिकूळ अभिप्राय दर्शित झाला होता तरी बहुमत झालें. आणि त्या अर्थी या सूचनेचा पुढील विचार थोड्या दिवसांच्या विलंबानें सांगतो असें मि. ग्लाडस्टन यांनीं या आठवड्यांत वचनही दिलें आहे.

विलायतेसच फक्त ही परीक्षा होत होत असल्या मुळें हिंदुस्थानांतील मोठमोठ्या पगारी जागांचें कुरणच इंग्लिश लोकासाठीं राखून ठेविल्या प्रमाणें आहे. परद्वीपीं इकडून जाणें बहुत खर्चाचें, प्रयासाचें व धोक्याचें आहे आणि त्या शिवाय अभ्यासाची सिद्धता, शरीराची दृढता व याची मर्यादा हीं सर्व एकत्र लागतात. पण ही परीक्षा इंडियात भरूं लागली तर परीक्षेच्या कसोटीनें बहुतेक नेटिव लोक पटकावतील अशी पूर्ण खातरी होऊन चुकली आहे म्हणून वरील सूचनेवर सरकारी पक्षा कडून असा आक्षेप निघाला होता कीं राजकीय अधिकार चालविण्यास इंग्रजी विद्येचा विलायतेसच होतकरू सिव्हील सरव्हंटांवर संस्कार घडला पाहिजे. इंग्लिशाच्या गृहस्थितीची ओळख, अस्सल इंग्लिश विद्वानांचा समागम व अन्य विलायती उपाधि यांनीं मनें संस्कृत होतात आणि राज्यकर्तृत्वाची शक्ति अंगीं येते असे विचार स्पष्टपणें सांगण्यांत आले. इंग्लंडांत सिव्हील सरव्हंटची जागा पतकरण्यास खरोखर या गोष्टी जरूर लागल्या असल्या परंतु नोकरी चाकरी या देशांत करावयाची असते तेव्हां इकडीलच वस्तुस्थितीचें दर्शन व लोकांचा समागम व विद्यामंदिरांतून अध्ययन हींच फार आवश्यक आहेत. स्वार्थ लोभानें बुद्धीला भ्रंश व विपर्यास पडला तर त्यांत सरकारच्या काकदृष्टीचा दोष कोणता?

येत्या दिसेंबरांत 'अमृतसर' येथें राष्ट्रीय सभा भरणार आहे म्हणून तिजनिमित्त पंजाबी लोकांनीं आगतस्वागत मंडळी नेमून आपल्या उद्योगास चांगला आरंभ केला आहे. नामदार दादाभाई नवरोजी यांस अध्यक्षस्थान स्वीकारण्या विषयीं विज्ञप्ती केली आहे परंतु त्यावेळी पार्लमेंट खुलें असतें आणि नामदार दादाभाई कधीं गैरहजर राहत नाहींत. ते सर्व प्रकरणांत आपलें लक्ष पुरवितात आणि पार्लमेंटची बैठक वृथा दवडीत नाहींत त्या अर्थीं ते येतील किंवा नाहीं या विषयी आम्हास मोठी शंका आहे.

✓मुंबई सरकारनें आपल्या कायदे कौन्सिलांत लोकप्रतिनिधी नेमण्या संबधानें महाराष्ट्रीय लोकांची निराशा केली. प्रांता प्रांता संबधेंन प्रतिनिधि निवडण्याचा हक्क विभागून न देतां त्यांनीं निराळेंच तत्व लागू केलें. जमीन्दार लोकांस हक्क दिला म्हणजे सरदार जहागीरदार वगैरे लोकांस मुखत्यार निवडण्यास सांगितलें. व्यापाराच्या नांवानें चेंम्बर आफ कामर्सला हक्क दिला. विद्येचा मान राखण्या साठीं युनिव्हरसिटीकडे मेहेरबानी केली. आणि लोकसंस्थाच्या नांवा खालीं मुंबईचें कारपोरेशन व लोकल बोर्डस यांस हक्क दिला. लोकांनीं या व्यवस्थेस योग्य अपवाद घेतले. परंतु लार्ड हारिस यांनीं त्यांची तक्रार ऐकण्याचा ढोंक दाखऊन शेवटीं सर्वजणास निराश व नाउमेद केलें.

इंडिया कौंसिल आक्ट पसार झाला तेव्हांच त्याची अंमलबाजी होण्या पूर्वीं पार्लमेंट मार्फत नियम व्हावयास पाहिजे होते असा पुष्कळांचा आग्रह होता तो कांहीं खोटा नव्हता. आंग्लो इंडियन अधिकारी त्याच्या अंमलबाजींत हरकती आणतील म्हणून शंका होती ती खरी ठरली. हिंदुस्थान लोकांनीं यश संपादण्या साठीं राष्ट्रीय सभेची अभिवृद्धि केली पाहिजे म्हणजेच काय ती विलायतच्या पार्लमेंटांत दाद लागेल.

✓इंडिया कौन्सिल आक्ट पसार झाला पण त्यापासून वऱ्हाड प्रांतास कांहीं प्रत्यक्ष फायदा नाहीं. हा मुलूख अमानी आहे याला स्वतंत्र प्रांतीय कायदे कौन्सिल नाहीं किंवा इंडिया कौन्सिलांत या प्रांतातर्फे एकही कौन्सिलदार नाहीं. या प्रांतांतील लोकांनीं सभा भरवून व्हाइसराय साहेबा पर्यंत अर्जिदार रेसिडेंट मार्फत आपला पक्ष पोंचविला तर कांहीं होण्यासारखें आहे.

वऱ्हाडच्या राज्यकारभारा प्रमाणें राजकीय स्थिती कोठेंच आढळणार नाहीं. हा प्रांत खालसा नाहीं किंवा संस्थानिकाच्या ताब्यांत नाहीं. गव्हाणांत मुलूख आहे खरा पण सर्व अम्मल इंग्रजी धर्तीवर चालतो. हैद्राबादचे रेसिडेंट म्हणजे या प्रांताचे गव्हर्नर आहेत. परंतु इतर प्रांतस्थ लोका प्रमाणें वऱ्हाडांतील प्रजेला कांहींच हक्क नाहींत. आमच्या मतें या मुलूखा वरील गव्हाणाचा हक्क सोडण्याचा काळ मागेंच येऊन चुकला आहे तेव्हां निजाम सरकारास हा परत द्यावा अगर राजकीय खलबतांत प्रशस्त वाटलें तर तो खालसा तरी करून टाकावा ! तसें झालें तर ही त्रिशंकूची स्थिती राहणार नाहीं.

---

# The Berar Samachar

MONDAY JUNE, 12, 1893

The rate of exchange between gold and silver has disturbed the equilibrium of the Indian finances. We have in miniature similar fluctuations in the local rate of exchanging a rupee into copper-pieces. Sixty four pices make one Rupee. That is the rate fixed by Government. But in the local market a rupee passes for sixty-two pices only. In a distant place away from the District or Tahsil station a rupee is changed for copper coins at the high discount of even two annas. This is neither due to any special appreciation of silver nor to any depreciation of the copper value in silver.

The cause is simply local and incidental. In addition to the legal tenders of Her Majesty the Queen there came in circulation in the province the copper coins of his Highness the Gaekwar. The Baroda copper—pieces were imported in large amounts worth thousands of rupees. This copper was meant for private use only. It came to be used with the old बाबशाही or त्रिशूळी pice. The merchants of the province made much money in the traffic of circulating Baroda copper—coins. At the banks, treasuries, railway stations, and post offices the government coins alone were accepted but for all other practical purposes Baroda coins were introduced. Besides they were offered at a very cheap rate viz 69 pices for a Government rupee. All of a sudden there came a rupture in this rate. The Government of India prohibited the importation of Baroda bronze and copper coins since 20th. April 1893. People misinterpreted this prohibition into a regular stop of the circulation of the pieces already imported. The Baroda pice came in vogue and free use because of its exact likeness to the Govt. coin in shape, size and impress. After the above mentioned order of the India government the Baroda pice was refused altogether but when it was before in high circulation a vast quantity of government pices was to be exported from the province. There was no demand for it. People now require the Government pice in large quantities There are demands for this district alone for the copper.—coins worth about half a lac of rupees. The Barada pieces are not available. They are being sent back to their native place while the old coins ara removed to the Nagpur side.

A remedy lies with the Commissioner. We earnestly urge him to issue orders to the Bombay—banks in the province to issue as many coppor—pieces as the local demand will require. The demand being unsatisfied at the bank the *sarafs* have begun speculative trafficking in Government copper—Coins. Such a state of things is highly undesiarble and most damaging to the interests of the middling classes of the society and we hope earnestly that the Commissioner will remove the grievance as early as possible.

We find a parallel passage on the condition of the Russian agricultural classes and it promises to be of great service in settling the question of the new survy settlement. If the passage holds true of Russia much more it does in India. In the latter country the peasantry forms 90 per cent of the population and this is a very large proportion. The proposed increase of 50 per cent in the general assessments will certainly tell upon the progress of agriculture and will ruin down the agriculturists as a class whose place will be taken up by the rich and monied persons in the society.

"The agricultural population of Russia is 88 per cent of its whole population and amounts to some 90 millions; in India the proportion is 90 per cent. Famines are frequent in both countries and their peasants deteriorate equally. "There is no more unmerciful creditor than the Russian Government. The taxes must be paid, however miserable may be the condition of the peasants; payment is demanded in cash the moment the harvest is over, and if the peasants cannot pay all their available property is simply seized and sold, the share of land, the house, and certain things considered as absolutely necessary for existence being alone exempted from such seizure... they are obliged to sell their grain in haste in a market which is soon glutted at low prices, or to borrow the money required... One feature is universal—namely the abject fear in which the the mounjik (peasant) stands of the terrorism of the ubiquitious administration. Even bears are not inaccessible to pity, but the Russian tax-gatheres knows no mercy—he will skin you five times...The very sense of suffering is blunted, by the belief that it is impssible to struggle against it." These observations are roughly true of India and will become so to the very letter. In one respect the Russian peasant has an advantage over his Indian brother—*his share of land, house, &c, are not liable to be seized and sold by the tax—gatherer.*"

## वऱ्हाड.

सानंदाश्चर्यानें आह्मी कळवितों कीं रा. रा. रंगनाथ नरसिंह मुधोळकर बी. ए. एल. एल. बी. यांनीं आपल्या गृहस्थाश्रमाची द्वितीयावृत्ति एका कुमारिकेच्या हातून प्रकाशित केली. राजश्री रंगराया सारख्या सुधारणाभक्ताविषयीं एका ज्योतिषानें खालील त्रैराशिकांत गणित वर्तविलें आहे तें:—

विचार : उच्चार : : आचार : (शून्य)

हवमान— या आठवड्यांत उकाडा विलक्षण होत आहे. शनिवारीं रात्रीं पाऊस चांगला पडला. रोगराई विशेष म्हणण्या सारखी नाहीं.

आह्मास कळविण्यास फार आनंद वाटतो कीं रा. रा. वामन नारायण बापट एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस 'रावबहादुर' हा किताब देण्यांत आला आहे रावबहादुर बापट हे करारी व स्वतंत्र विचाराचे गृहस्थ आहेत. हे राजसेवे प्रमाणें देशसेवेंत मन घालतील तर यांच्या सद्गुणांचा आमोद अत्यंत प्रिय वाटेल.

लेफटेनंट हार्सब्रच असि. कमिशनर हे पहिल्यानाच खेपेस संपूर्ण हायर स्टांडर्ड पु.

रीक्षेत पसार झाले हें विशेष आनंदाचें वर्तमान होय.

खालील गृहस्थ मागील व यंदाच्या परीक्षा मिळून गोळाबेरजेनें संपूर्ण परीक्षा पसार झाले ते स्टांडर्ड वारीनें येणें प्रमाणें:—

हायर– आर. ए. सिम्पसन, एफ. डब्ल्यू ए. प्रिडो, सी. शामराव, इ. मार्शल.

लोअर (सर्व)– मीर अनवरअली, रामराव बापूजी, विष्णु रंगनाथ, गणेश विष्णु, व सदाशिवराव रामकृष्ण.

लोअर ( नायब तहशीलदार व डेपुटी क्लार्क आफ कोर्टा पुरतें ) -- माधवराव रामचंद्र, गणेश राजाराम, महमद साहेब, त्रिम्बक नारायण, व नारायण रामचंद्र.

लेफ. माडिट, व लेफ. हेग हे उभयता हायर स्टांडर्ड पसार आहेत पण फक्त त्यांचीं परीक्षा मराठींत उतरावयाची उरली अहे. क्याप्टन कोलंब हे हायर प्रमाणें लिव्हील प्रश्नाच्या कागदांत व रा रा. विठ्ठल सदाशिव हे लोअर प्रमाणें क्रिमिनल कागदांत गेल्या परीक्षेंत उतरले.

मेसर्स सिंपसन व प्रिडो असि. कमिशनर वर्ग ३ यांस माजिस्ट्रेट वर्ग १ चा व लेफ. हासिब्रध असि. कमि. वर्ग ३ यांस माजिस्ट्रेट वर्ग २ चा अधिकार देण्यांत आला आहे.

रा. रा. लक्ष्मण नारायण गोखले हे यवतमाळास आक्टींग तहशिलदारीवर होते पण रा. रा. भैरव प्रसाद पोलीस इनस्पेक्टर यांची नेमणूक त्या जागीं झाली ह्मणून ते पूर्ववत् नायब तहशिलदार झाले.

अपमृत्यु– गेल्या बुधवारीं येथील डेपटी कमिशनर कचेरींतील कारकून रा. रा. सीत्र्प्पा चिन्नपा यांचा १७।१८ वर्षांचा बंधु शाळेंतून घरीं जातांना नदींत पोहण्यास गेला आणि पोहतांना बुडून मेला.

पातुर येथील एक जुने चीफ कानस्टेबल रा. रा. पदमसिंग आपल्या मुलासह एका गड्याला घेऊन रानांत गेले असतां तिघेजण वीज पडून मरण पावले.

√जैनाचे गुरु रत्नकिर्ती व कांहीं इसम यांजवर एका मुलाच्या गळफांसा संबंधानें फौजदारी झाली होती पण तींत ते सर्वजण निर्दोषी ठरले.

---

नोटीस

सौ. लक्ष्मी मर्द मुक्ताजी सईतवाळ व बाळाजी व धोंडी वलद बिठोबा सईतवाळ खुळे चोपदार रा. पेठ देऊळगांवराजा ता. चिखली जि० बुलडाणें यांस.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, शुद्धवऱ्हाडी अंक २१ ता. ३।६।९३ इ. च्या पत्रांत दिलेली नोटीस पावली. तिचें उत्तर तुझें ह्मणण्या प्रमाणें औरंगाबादेस पाठवावें तों त्यां तेथला पत्ता लबाडीनें न लिहिल्यामुळें व तुझी माहेर घरीं रहाण्याची जोखीम तुझे वरील उभयता बंधूवर असल्यामुळें आमचे नोटिसीची हकीकत तुला लवकर कळावी ह्मणून देऊळगांवराजा व औरंगाबाद या दोहीं ठिकाणीं पाठविली आहे. त्वां दिलेल्या नोटिशींतील हकीकत अगदीं खोटी आहे गंधर्व झाल्यावर तूं जितके दिवस माहेरीं राहिल्ये ह्मणतेस तें तूं फार अज्ञान असल्यामुळें आमचीं मुलें आलीं असतांही तुझे आईबाप व बंधु यांनीं तुला रवाना न केल्यामुळें तुला रहाणें भाग पडले याचा दोष आह्मावर मुळींच नाहीं. तुला ऋतुप्राप्त होऊन अजमास ३ वर्षे झालीं व तूं पांच वर्षांपासून पळून गेल्या तारखेपर्यंत माझे घरींच होतीस मग तूं खाण्याचा खर्च मागतेस? हें किती वेरें लबाडीचें कृत्य आहे तुझ्या मतें जरी मी बाहिर ख्याली आहों ( मी बाहिर ख्याली मुळींच नाहीं ) तरी तुझ्या खऱ्या संसारसुखांत अगदीं कमीपणा नाहीं. वरी तूं व मी असें उभयतांच आहों. घराची मालकीण तूंच मग तुला जाच व त्रास अथवा जुलूम कोणाचा व कोणत ही प्रकारें नाहीं. मग तुला देऊळगांवराजा अगर औरंगाबाद किंवा दुसरें कोठें ही राहून पोसण्याचे अगर जामीन देण्याचें कारण नाहीं. ज्या अर्थी तूं माझी गंधर्वाची स्त्री व तुझ्यावर माझा नवरेपणाचा हक्क आहे त्या अर्थी तूं मजजवळ मी ज्या गांवीं राहीन तेथें, तुला रहाणें भागच आहे. तूं माझ्यापांतूनही वेगळी राहूं इच्छितेस तर माझ्या घरांत अर्ध्या जागेंत रहा माझी मनाई नाहीं. पण असें तुझें रहाणें जगाविरुद्ध आहे.

तुझा बंधू धोंडी कांहीं कोष्टी वगैरे मंडळी मंडळीसह येऊन चोरा प्रमाणें जंगलांत राहिला होता व तूं ता. २०।३।९३ इसवीं रोजीं रात्रीं माझ्या घरांतून ३३८८१२ रुपयाच्या मालासह त्या मंडळीच्या मदतीनें पळून गेलीस. त्या बद्दल मी सरकारांत काम चालविलें आहे. माझ्या वंशाची वृद्धी व्हावी या उद्देशानें तुझ्याशीं मी गंधर्व लावले आहे. करितां नोटीस दिल्या तारखे पासून २१ दिवसाचे आंत माझे घरीं येऊन सुखें नांदावें. येतांना तुझे आंगावरील डागिने व त्वां चोरून नेलेले डागिने वगैरे खालीं तपशील दिल्या प्रमाणे घेऊन यावें. मी नांदविण्यास तयार आहे. या प्रमाणें न करशील किंवा दुसरा घरठाव करशील तर तुझ्यावर व तुझ्याशीं घरठाव करणारावर फौजदारींत काम चालवून अखेरपर्यंत मला जो खर्च येईल तो व या नोटिशीच्या खर्चासुद्धां भरून घेतला जाईल हें पक्कें समजावें

३३८८१२ रुपयाचा तपशील
तुझे अंगावर असलेले डागिने

| नग. | वजन तोळे | किंमत. |
|---|---|---|
| कड्यां २ चांदीचीं | १६ | १६ |
| दंडवाळ्या २ चांदीच्या | ३५ | ३७ |
| पाटल्या २ चांदीच्या | १६ | १७ |
| नथ १ सोन्याची | ७॥ मा. | १५ |
| मंगळसूत्र १ सोन्याचें | २॥ मा. | ६ |
| गरसळी १ सोन्याची | १५ | ३० |
| | | १२० |

चोरून नेलेला माल

| | वजन तोळे | किंमत |
|---|---|---|
| तोडे २ चांदीचे | ६३॥ | ६९ |
| करदोडा १ चांदीचा | ३० | ३० |
| मुद्दी (वेड) १ सोन्याची | १ | २५ |
| नगदी रुपये सुर्ती ८९ | | ८९ |
| खण १ जरीचा | | २ |
| खण २ रेशमी | | १ |
| लुगडें कोरें सुती | | २ |
| चोळ्या सुती २ | | ८१२ |
| | | २१८८१२ |
| | | ३३८८१२ |

( सही )
मुक्ताजी वलद भिमाजी सइतवाळ राहणार अंजनी खुर्द तालुके मेहकर जिल्हे बुलडाणें दस्तुर खुद्द

---

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस व मुख्यत्वें करून सईतवाळ मंडळीस जाहीर करण्यांत येतें कीं, बिठोबा चोपदार याची मुलगी व बाळाजी व धोंडी खुळे चोपदार राहणार पेठ देऊळगांवराजा यांची धाकटी बहीण नामें लक्ष्मी मर्द मुक्ताजी सईतवाळ ही माझी गंधर्वाची स्त्री असून तिनें तिचे वडील बंधूनें माझें घरून ३३८८१२ रुपयाचे मालासह चोरून नेलें आहे याजबद्दल आजचे अंकांतच मी दिलेली नोटिस आहे. तिच्या वर माझा नवरेपणाचा हक्क देहांत जीव आहे तोपर्यंत आहेच. करितां इच्याशीं कोणी घरठाव करूं नये. केल्यास त्याजवर फौजदारींत काम चालविलें जाईल. हा जाहीर नामा तारीख ७ माहे जुन सन १८९३ इ.

( सही )
मुक्ताजी वलद भिमाजी सईतवाळ
दस्तुर खुद्द.
राहणार अंजनी खुर्द ता० मेहेकर जि० बुलढाणें.

---

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोले म्युनसीपल कमेटीचे हद्दीतील बारा फताचे आंत गुरें चारण्याचे हक्कांचा लिलाव सन १८९३।९४ इसवी साला बद्दल ता. ५ माहे जुलई सन १८९३ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू तारखेस सदर्हू वेळीं टौनहालांत हजर व्हावें कळावें ता. १०।६।९३

G. A. Vaidya
For Secretary
A. M. C.

---

## जाहिरात.

सर्वत्र लोकास खाली सही करणार याजकडून असें जाहीर केलें जातें कीं पिंपळगाव राजा तालुके मलकापूर जिल्हा बुल्ढाणा येथील आमची इनाम जमीन खालसा झालेली व धानवडी वगैरे आमच्या स्वतांच्या संमतीशिवाय कोणी गहाण घेईल अगर खरेदी घेईल अथवा त्याजवर कर्ज देईल तर त्यांस व सदर्हू आमचे खालसा झालेली जमीन व धानवडी वगैरेवर कोणच्याही प्रकारची जबाबदारी रहाणार नाहीं. जो कोणी कर्ज देईल अगर गहाण ठेवील अगर खरेदी घेईल त्याचा तोच पैशाचा जबाबदार आहे ह्मणून दिली जाहीरात कळावें. तारीख ६।६।९३ इ.

सही
सदाशीव रामचंद्र महाजन ऊर्फ
दाजी साहेब वर्वेकर तर्फे
कुलमुखत्यार गोविंद
अंताजी चितळे
दस्तूर खुद्द.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणें.

दि. कि. मो. नंबर ८

१८९३

डेपुटी कामिशनर साहेब बहादूर जिल्हे इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव गोविंदसींग

बापाचें नांव खुशालसींग राहणार करजगांव तालुके इलिचपूर जिल्हे इलिचपूर यांस मयत.

गणेशसींग बापाचें नांव फत्तेसींग राहणार करजगांव तालुके इलिचपूर जिल्हे इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांही भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं तारीख २७ माहे जून सन १८९३ इ० रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं आमची स्वारी असेल तेथें कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी. आज ता. २२ माहे ४ सन १८९३.

( Signed ) W. Hastings
Deputy Commissioner
Ellichpur District
उपहज्प.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल कारितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणें.

दि. कि. मो. नंबर १२

१८९३

डेपुटी कामिशनर साहेब बहादूर जिल्हे इलिचपुर यांचे कोर्टांत.

नांव मोतीलाल व बहादरमल

बापाचें नांव छोटमल पैकीं बहादरमल आ. पा. आई धादीबाई राहणार इलिचपूर तालुके व जिल्हे इलिचपूर यांस

छोटमल राहणार इलिचपूर तालुके इलिचपूर जि. इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज कारितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता. १८ माहे जून सन १८९३ इ० रोजीं सदर्हु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं चिखलदरा येथें या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी. आज ता. २९ माहे ४ सन १८९३ इ.

(Signed) W. Hastings
Deputy Commissioner
Ellichpur District
उपहज्प.

---

## वर्तमानसार.

खानदेशांत दरोडे व रस्तेलूट यांचा जशी काय समृद्धीच चालली आहे असें दिसतें हा प्रकार अझून्ही बंद होत नाहीं. हें त्या जिल्ह्याच्या पोलिसास एक मोठें सर्टिफिकीटच आहे व काठीस सोनें बांधून हवें तिकडे हिंडावें अशी आह्मी हिंदुस्थानांत शांतता केली आहे असें ह्मणणाऱ्या सरकारासही एक प्रकारचें भूषणच आहे. असले कांहीं प्रकार मागें लिहिलें असून या आठवड्याचीं त्या जिल्ह्याचीं जीं वर्तमानपत्रें हातांत आलीं तीं पाहून तर फारच भय वाटतें आणि हा असला प्रकार तिकडे आणखी किती दिवस चालणार व ते भयंकर प्रसंग आणखी कोणकोणावर येणार याची मोठी भीती वाटते. तीं पत्रें पुढील प्रमाणें गोष्टी सांगतात.

१ अंमळनेर व पारोळें यांच्या दरम्यान नुकतीच एक संध्याकाळीं ७।८ वाजतां भयप्रद रस्तालूट झाली. एका श्रीमान गुजराथी गाडी लुटण्याचा दरोडेखोरांचा इरादा होता, पण आधीं दुसरीच एक गाडी सांपडली. त्यांत एक माणूस. त्याची बायको, मूल व दुसरा एक अशीं चार माणसें असून चोरांस पाहून शेवटील माणूस गांवांत वर्दी देण्यास गेला असतां बाकीच्यांस चोरांनीं फार मारलें व तो गाडींतला माणूस ठार झाला. असून मदत लवकर आल्यामुळें बायको व मूल बचावलीं.

२ चोपड्याहून २।३ कोसांवरील एका खेड्यावर दरोडा पडला. दरोडा येणार हे गावकऱ्यांस आगाऊ कळलें असल्यामुळें तेही हत्यारें वगैरे सज्य करून तयार होते, पण मध्यरात्रींपर्यंत दरोडखोर न आल्यामुळें गांवकरी निजले. इतक्यांत दरोडखोरांनीं येऊन प्रथम बे सावध झालेल्या गांवकऱ्यांजवळचीं हत्यारें हिसकून घेतलीं व त्याच शस्त्रांनीं गांवकऱ्यांवर हल्ला केला व त्या चकमकींत एक गांवकरी ठार झाला.

३ चाळीसगाव तालुक्यांत वाकडी नावच्या दगडू पाटलाच्या घरीं रात्रीं ८।९ वाजतां दरोडा पडला. मालक घरीं नव्हता व घर फार मजबूत. त्यांचा आंत शिरकाव होईना ह्मणून कुऱ्हाडीनें दरवाजा फोडून आंत शिरले. मालकानें रक्षणार्थ एक बाई ठेवली होती ती प्रथम भेटतांच तिला लुटली व ही गडबड ऐकून मालकीण भुसारांत लपली. चोरांनीं घर ओस पाहून दारें व कुलुपें फोडून फार नुकसान केलें, पण महत्वाचा ऐवज त्यांचे हातीं लागला नाहीं.

त्या जिल्ह्याचें पोलिस, जिल्ह्याचे मुख्याधिकारी व इलाख्याचें सरकार यास ही गोष्ट पसंत आहे काय? असेल तर त्यांच्या नांवास हें मोठें लांछन आहे.

चिकागो येथील प्रदर्शनांत मांडण्याकरितां वेगळाल्या देशांतून वेगळाले पदार्थ गेले असून त्यांतील ज्यांचे पदार्थ विशेष चांगले ठरतील त्यास इनाम देण्याचें ठरलेलें आहे. ह्या चांगल्या वाईट पदार्थांचे परीक्षण करण्याचें काम व्यवस्थापक मंडळीनें पंचांकडे न देतां एकट्याच अमेरिकन माणसाकडे दिलें असल्यामुळें इंग्लंड, फ्रान्स, जर्मना, आस्त्रीया व स्पेन आणि दुसरी मिळून १७ राष्ट्रांनी प्रदर्शनांत मांडलेले आपले पदार्थ गोळा करून परत रवाना करण्याची तयारी केली असें ता. २७ ची तार सांगते त्यास सयुक्तिक कारण आहे. युरोपांतल्या लोकांना पदार्थांचें परीक्षण करण्याचें कामही एकट्याकडे दिल्याचें सहन होत नाहीं आणि हिंदुस्थानांतल्या तितक्या माणसांस फांशीं देण्याचें असलें तरीहि त्या कामास पंचांची जरूर नसून एकट्या युरोपियन माणसास तें काम सहज चांगल्या रीतीनें करतां येईल, असें तेच युरोपियन प्रतिपादन करतात व त्याबद्दल त्यांस यत्किंचितहीं लाज वाटत नाही. हें या १९ व्या शतकांतल्या शहाणपणाचें एक उदाहरणच आहे. ठा० अ०

देवाच्या दृष्टीची चोरी— ध्रांगध्रा ( काठ्यावाड ) येथील पारसनाथच्या देवळांतील मूर्तीच्या दृष्टी चोरांनीं चोरल्या, या दृष्टी हिरकण्यांच्या होत्या.

हिंदुस्थानांत विलायतेंतून बागवान आणण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे.

लार्ड राबर्ट्स हे बहुतकरून आयर्लंडचे सेनापती होतील.

एका फ्रेंच डाक्टरानें मनुष्याच्या मस्तकाच्या कवटीस कुत्र्याच्या मस्तकाची कवटी बसवून पाहिली. प्रयोग सिद्धीस गेला.

हैद्राबादच्या कारभारांत युरोपियन लोकांचा शिरकाव करण्याची खटपट ह्या पाच्यानें चालली आहे.

धोतऱ्यासून एका प्रकारचें जालीम अत्तर काढतात. फ्रांसांत याचा फार फैलाव झाला आहे.

गायकवाड महाराज आपल्या संस्थानांत रेशमी किड्यांच्या वृद्धीचे उपाय योजित आहेत. न्या.

आस्ट्रियात त्या देशाच्या संरक्षणा साठीं जास्त तयारी केली पाहिजे. असें तेथच्या बादशहानें आपल्या भाषणांत सांगितलें.

मणिपूरच्या आसपास बंडावा होऊन ३०० मनुष्यांची कत्तल झाल्याचें समजतें.

शिकागो एक्शिबिशनला एकंदर दहा कोटी डॉलर्स खर्च आला. या पासून उत्पन्न काय होतें तें पहावें.

हिंदुस्थानावर लष्करी खर्चाचा बोजा अन्यायानें अतिशय वाढण्यांत येतो त्या बद्दल लंडन टाइम्सनेंही लार्ड नार्थब्रुकसारखें आपलें मत दर्शविलें आहे. सु. प.

बॅरन रायशील्ड या प्रसिद्ध नवकोट नारायणाच्या पेढीच्या भींतीवर खालीं लिहिलेलीं वाक्यें मोठ्या अक्षरांनीं लिहून चिकटविलेलीं होतीं. तीं सर्वांनीं ध्यानांत ठेवावीं.

आपल्या धंद्यांतील बारीकसारीक गोष्टी सुद्धां शोधक बुद्धीनें पहात जा.

प्रत्येक गोष्टींत चलाखी असावी.

विचार करण्यास वेळ घ्या पण निश्चय करणें तो तावडतोड करा.

पुढें पाऊल टाकण्यास भिऊं नका.

जीवनार्थ कलहांत धैर्य सोडूं नका.

प्रामाणिकपणा 'पवित्र वस्तु' मानून कधींही सोडूं नका.

उद्योगधंद्यांत लबाड्या सांगूं नका.

निरर्थक ओळखी करूं नका.

तुह्मी आहां त्यापेक्षां जास्त आहां असें दाखविण्याचा कधींही प्रयत्न करूं नका.

लोकांचें देणें विनाकारण ठेवूं नका.

योग्य वेळीं पैसा धंद्यांत कसा घालावा हें शिका.

अमली पदार्थांचें सेवन करूं नका.

वेळाचा सदुपयोग करा.

नशिबावर हवाला ठेवूं नका.

प्रत्येकांशीं सभ्यतेनें वागा.

धीर कधींही खचूं देऊं नका.

सदरहू गोष्टी ध्यानांत ठेवून मेहनत करा ह्मणजे यश व संपत्ति घरीं चालून येईल.

इतालींत नवीन बंदूक निघाली आहे. तिची गोळी ४००० फूटांवरून मारली तरी पांच इंच जाडीच्या लाकडी तक्याला भोंक पाडून पार निघून जाते.

जांभई येते याचें कारण फुप्फुसांतील हवेची कमतरता हें होय.

जगांत दरवर्षीस ३,००,००,००,००० रत्तल कागद खपतो व इतका कागद पुरविणाऱ्या ४६०० गिरण्या आहेत.

आगगाडीचे रूळ १८ वर्षे चांगले टिकतात.

कांच कापण्याचा हिरा सुमारें तीन महिने चांगला राहतो.

ग्रीसच्या राजाला बारा भाषा येतात.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणें.

दि. कि. मो. नंबर ११

१८९३

डेपुटी कामिशनर साहेब बहादूर जिल्हे इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव मोती व सखाराम.

बापाचें नांव रावजी आ. पा. चुलता सोनाजी राहणार नालवडा तालुके दर्यापूर जिल्हे इलिचपूर यांस मयत.

रावजी बापाचें नांव लक्ष्मणजी राहणार नालवड तालुके दर्यापूर जिल्हे इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे मालामिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं तारीख २८ माहे जून सन १८९३ इ० रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं स्वारी असेल तेथें कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी. आज ता. २६ माहे ४ सन १८९३.

( Signed ) W. Hastings
Deputy Commissioner
Ellichpur District
ज्यडज्य.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणें.

दि. कि. मो. नंबर १३

१८९३

डेपुटी कामिशनर साहेब बहादूर जिल्हे इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव सोमनाथ

बापाचें नांव कन्हैराम पंडीत आ. पा. आई जमनाबाई राहणार इलिचपूर तालुके व जिल्हे इलिचपूर यांस मयत.

कन्हैराम राहणार इलिचपूर तालुके इलिचपूर जिल्हे इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हु मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता. २७ माहे जून सन १८९३ इ० रोजीं सदर्हु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं चिखलदरा येथें या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी. आज ता. २९ माहे ४ सन १८९३ इ.

( Signed) W. Hastings
Deputy Commissioner
Ellichpur District
ज्यडज्य.

---

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना.

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचें सरटिफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याच्या मिळकतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमण्याविषयीं सन १८९० चा आक्ट ८ प्रमाणें

अर्जाचा नंबर ३

१८९३ वर्ग १३

डिपुटी कमिशनर साहेब जिल्हे इलिचपूर याचे कोर्टांत.

अर्जदार बापुन्या बापाचें नांव पंड्या जात माहार राहणार भुगांव तालुके इलिचपूर

गोंद्या ( अज्ञान ) बापाचें नांव बक्या जात माहार राहणार धुगांव तालुकें इलिचपूर यानें ( याच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचे सरटीफिकीट मिळावें ह्मणून ) ( त्याचे पालन व माल मिळकतीचा कबज्या लायक मनुष्य केला जावा ह्मणून ) अर्ज दिला आहे यास्तव मृत्यु पत्राचें आधारें किंवा दस्तऐवजावरून किंवा अगदीं जवळचे जातलगणाचें कारणावरून, किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदर्हू अज्ञानाचें माल मिळकतीवर सांभाळकर्ता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे की त्यांनीं तारीख २७ माहे जून सन १८९३ इसवी रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं आमची स्वारी असेल तेथे ह्या कोर्टांतच हजर होऊन आपआपल्या हकाची लेखी हकिकत दाखल करावी तारीख २४ माहे ४ सन १८९३ इसवी.

शिक्का

( Signed) W. Hastings
Deputy Commissioner
Ellichpur District
डिपुटी कमिशनर.

---

☞ हें पत्र आकोले येथे कै० वा० खंडेराव बाळाजी फडके याचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही " ३ " ८
साळअखेर " ७ " १८
किरकोळ अंकास ............... ४

नोटिशीनद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ......०१

Annum in arrears 7 1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy........................1as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisemen
Below 10 lines... 2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

VOL. XXVII — AKOLA MONDAY 19 JUNE 1893 — NO. 24

वर्ष २७ — आकोला सोमवार तारीख १९ माहे जून सन १८९३ इ० — अंक २४

## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूंतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतील धकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व ह्यातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणे, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गुण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें तावडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासिनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेंत सलका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लवकी पांढरि होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जनानद्दाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरीक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारे टॅानिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोंहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्मांच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जोंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालू असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूंची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजारांत तें विकत मिळतें F. Moor Clements.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधागिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक 'नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कॅंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बाळंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बेनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकान.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक आषाढ शुद्ध ६ शके १८१५

गोऱ्या लोकांच्या लष्करासाठीं एक कायदा आहे त्या आधारें प्रत्येक छावणी मागें एक चकल्याचा बाजार नेटीव स्त्रियांच्या देहविक्रयासाठीं घातलेला असतो. जो गोरा सोल्जर कामांध होईल त्यानें तेथील एखाद्या सुंदरशा पुतळीशीं रममाण होऊन कामशांति करून घ्यावी असा त्या बाजारचा उद्देश आहे. प्रत्येक छावणीसाठीं हा वेश्यांचा पुरवठा होण्यासाठीं फारफार विचित्र हुकूम दिल्याचें आह्मी मागें बहुत वेळां ऐकिलें आहे. तेथें दुर्दैवानें ज्या स्त्रिया जाऊन पडतात त्यांची वेळोवेळ परिक्षा डाक्टर मार्फत होऊन त्यांस संभोगपात्र असल्या विषयीं माजिस्ट्रेटाचें सर्टिफिकीट मिळत असतें. त्यांस उपदंशजन्य विकृति झाली तर इस्पितळांतून त्यांस औषधोपचारासाठीं ठेऊन घेतात. आणि त्या स्वतांची परीक्षा करून घेण्यांत किंवा दवाखान्यांत राहण्यास चुकल्या तर त्यांस तुरुंग, दंड, हद्दपार वगैरे शिक्षा होत असतात. वरील कायदा व वरील प्रकार बंद करण्या संबंधानें कामन्स सभेचा १८८८ सालीं जून ५ तारेखेचा हुकूम आला होता तरी देखील योग्य बंदोबस्त झाला नाहीं. विलायतेस मि. म्याकलारेन या गृहस्थांच्या अध्यक्षतेखालीं एक मंडळी हा कायदा रद्द करण्यासाठीं स्थापित झाली आणि त्यांनीं एक डाक्टर व डाक्टरीण या देशांत पाठवून इत्थंभूत माहिती मिळविली तेव्हां कामन्स सभेच्या खलित्याची अंमलबारी कोठेंही होत नाहीं असें आढळून आलें.

हिंदुस्थानचे मुख्य सेनापति लार्ड राबर्टस विलायतेस नुकतेच गेले तेव्हां त्यांनीं वरील गर्हणीय वें कालिमा आणणाऱ्या प्रकारा संबंधानें कानावर हात ठेविला इतकेंच नाहीं तर सर्व वरील गोष्टी नाकबूल केल्या आणि त्यांनीं आश्चर्य दर्शविलें कीं खरोखर तसा प्रकार असतां तर तो त्यांना ठाऊक असलाच पाहिजे होता. लार्ड राबर्टस सेनापति यांनीं सर्व गोष्टी खोट्या ह्मटल्या ह्मणून मि. म्याकलारेन यांनीं एक पत्र स्वदस्तुरचें प्रसिद्ध केलें कीं आमची माहिती खरी आहे हें नुसतें तोंडातोंडीं नाहीं तर वरील आक्टा अन्वयें १८९२ च्या दिसेंबर महिन्यांत माजिस्त्रेटच्या सहीचें सर्टिफिकीट आमच्यापाशीं आहे तें योग्य वेळ आली ह्मणजे प्रकाशित करण्यांत येईल.

हें सणसणीत, पुराव्यासह व मुद्देसूत पत्र वाचल्या बरोबर व्हाइसराय साहेबांनीं स्टेट सेक्रेटरीपाशीं आपली पराकाष्ठा करून मोठ्या मिन्नतवारीनें वरील प्रकरणाच्या चौकशीसाठीं एक कमिशन बसविलें. सदहु कमिशननें साद्यंत रिपोर्ट प्रसिद्ध करण्यापूर्वीं असें जाहीर केलें आहे कीं, हाऊस आफ कामन्सचा हुकूम खरोखर मोडला जात आहे परंतु त्यांत लष्करी अंमलदारांचा अपराध नाहीं.

नेटीव स्त्रियांस व्यभिचाररत करण्यासाठीं बाजार घातला त्या ऐवजी इंग्लंडाहूनच गोऱ्या स्त्रिया सोल्जरासाठी जहाजांतून आणिल्या असत्या तर त्यांच्या या संस्थेचा कांहीं तरी दोष कमी झाला असता. इंग्लिश लोकांच्या कानडा व केप कालनी कडील वसाहतींत वरील पद्धतीवर वेश्यांचा बाजार उभारला असतां ह्मणजे सरकारास त्यांच्या कृतीचे अनर्थ स्पष्टपणें कळून आले असते. नागडी झाली तर नेटीव बाई होईल आणि त्यांना पुरुषपणा दाखविणोर सरकारचें राज्य संरक्षक लष्कर!

राष्ट्रीय सभे विषयीं विसर पडत चालल्या सारखें दिसतें. जिकडे तिकडे इंडिया कौंसिल आक्टा विषयीं चळवळ दिसून येते. ही चळवळ गैर आहे असें आम्ही म्हणत नाहीं. पण तेवढ्यानें आपला कार्यभाग साधत नाहीं. फक्त एवढेंच ह्मणणें कीं या चळवळीमुळें राष्ट्रीय सभेच्या कामास व्यत्यय व आळस होता कामा नये आणि उत्कर्षीं त्या चळवळीचें स्वरूप एकवटीनें राष्ट्रीय सभेंत दृष्टीस पडलें पाहिजे. पंजाबांत 'राष्ट्रीय सभा' यंदा भरणार आहे. हा लांबवरचा पल्ला आहे ह्मणून या सालीं विशेष काळजी आहे. पंजाबांतील लोक आतां पासून त्या सभेच्या तयारीस लागले आहेत ही आनंदाची गोष्ट होय. उत्तरोत्तर त्या सभेचा उत्कर्ष व भरभराट होत जाईल त्या मानानें आपली राजकीय चळवळ जोरानें चालून रंगारूपास येणार आहे. दिसेंबर महिन्यास अजून अवधि आहे ह्मणून स्वस्थपणा व थंडेपणा कांहीं उपयोगाचा नाहीं. राष्ट्रीय सभा ही लोकांच्या विचारांतून दूर जाऊं नये एतदर्थ सर्व प्रयत्न चालूं पाहिजेत. राष्ट्रीयपणा सध्यां येत चालला आहे तो दृढ होण्यास व बळावण्यास उपाय एकच आहे. तो असा कीं लोकांच्या बोलण्या चालण्यांतून राष्ट्रीय सभेच्या गोष्टी वारंवार ऐकूं आल्या पाहिजेत. जागृति कायम राहण्यास नेहेमी तिजसंबंधानें लोकांस विचार करणें भाग झालें पाहिजे. लोकांस शिक्षण राष्ट्रीय सभेविषयीं सदोदित मिळालें पाहिजे, लोकांच्या निरानिराळ्या मंडळ्या राष्ट्रीय सभेनिमित्त जमल्या पाहिजेत, आणि नेहमीं त्याच सभेचे विचार लोकांच्या मनांतून घोळले पाहिजेत. ही स्थिती येईल तेव्हांच राजकीय हक्कास आपण पात्र होऊं. नाहींतर कौंसिल आक्टाच्या नादांत टरफलाला भूलून खोबरें बाजूस सारलें असें होऊं नये ह्मणून आह्मी मनापासून लोकांस जागें करितों.

अधिकारसंपन्न डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट आपल्या माजिस्ट्रेटीचा किती दुरुपयोग करूं शकतात याचें प्रत्यक्ष उदाहरण बंगाल्यांतील सिल्हीलिपन मि. फिलीप्स यांची कारकीर्द होय. या साहेबांनीं मेमसिंगचे राजावर व दुसऱ्या आणखी एका राजावर आपली हुकमत गैरवाजवी चालविली म्हणून त्यांचें नांव पार्लमेंट

पर्यंत जाऊन त्यांस दोष लावण्यांत आला. पण यांच्या सारखे जे मनुष्यप्राणी विवेकशून्यत्वानें दुसऱ्याच्या छळास प्रवृत्त होतात त्यास शद्बाचा मार तो काय कामाचा? शाद्बिक दोषाची ते बिलकूल परवा करीत नाहींत. ही गोष्ट पारिपत्य करणाऱ्यांस कळत नव्हती असें नाहीं परंतु देशबंधुत्वाच्या प्रेमानें न्यायाचा विसर पडला असावा.

सदर्हू फिलिप्स साहेबांची माजिस्ट्रेटी काढून घेऊन त्यांजकडे दिवाणी काम देण्याचें ठरलें आहे. परंतु त्यांचा त्या कामांत निभाव लागेल असें वाटत नाहीं कारण ते हाय कोर्टाचे जज्जास शहाण्यांत लेखीत नाहींत. 'अमृत बझार पत्रिके' च्या मतें त्यांस कस्टमखात्यांत अफूखात्याकडे अधिकारी नेमावें ह्मणजे ते तेथें चांगले गुंगतील.

माजिस्ट्रेट ह्मणजे पोलिसांचा राजा. माजीस्ट्रेट व पोलीस एकत्र झाले ह्मणजे न्यायाचा फासिच उडतो आणि लोकांचा छळ कायदेशीर होतो. ही गोष्ट या देशांत सर्वत्रिक आहे. न्यायाधीशाकडे बंदोबस्त करण्याचा पोलिसांचा कारभार असूं नये हें इष्ट आहे पण त्याची तोड काढणार कोण!

प्रस्तुत इंडिया संबंधानें पुष्कळ प्रश्न पार्लमेंटांत निघतात आणि उत्तरोत्तर हाच क्रम कायम होत चालला तर या देशाचें भाग्य खात्रीनें उदयास येईल. ब्रिटिश कांग्रेस कमिटींत नवीन मंडळी सामील होत आहेत आणि पार्लमेंटांतही कांहीं सभासद एका जुटीनें हिंदुस्थानचा पक्ष चालवीत आहेत. हिंदुस्थान सरकारला व स्टेट सेक्रेटरीला हे लोक चैन पडूं देत नाहींत आणि उडवाउडवीचे जबाबावर त्यांस ते कधीं निसटूं देणार नाहींत.

पण नवीन एक टाळाटाळीचा मार्ग काढण्याचा बेत मि. रसेल अंडर सेक्रेटरी यांच्या एका उत्तरा वरून व्यक्त झाला तेव्हां पासून एक निराळें विघ्न हल्लींच्या कायदे कौन्सिला पासून उद्भवण्या सारखें दिसतें. श्री क्षेत्र काशी येथील देवालया संबधानें वर्षभरापूर्वीं जें मोठें बंड झालें व मडामड लोकांस जबर शिक्षा देण्यांत आल्या त्या प्रकरणाचा निवाडा व्हावा ह्मणून मि. केन यांनीं कामन्स सभेंत प्रश्न काढिला पण त्यावर जबाब असा कोरडा मिळाला कीं, त्या प्रांताच्या स्थानिक कायदे कौन्सिलापुढें नव्या नियमा अन्वयें शोध करण्यांत यावा. हा हवाला मोठा घातुक आहे आणि अशा हवाल्यावर कामन्स पुढें इंडिया आफिस कोणताच प्रश्न निघूं देणार नाहीं. वरील जबाब मोठा खोल व गूढ अर्थाचा आहे. आह्मास उमेद अशी आहे कीं, या नव्या कौन्सिलाच्या योगानें पूर्वीपेक्षां बहुत बहुत प्रश्न पार्लमेंटांत निघाले पाहिजेत. या कौन्सिलावर हवाला सोंपविला तर त्या पासून आमचें मोठें नुकसान आहे. अगोदरच नवीन कायदे कौन्सिलचे नियम निरनिराळ्या अटींनीं फार संकूचित व निरुपयोगी झाले आहेत. प्रश्न विचारण्यांत आले तर त्यावर जबाब देण्याचें सरकारच्या मर्जीवर ठेविलें आहे आणि त्या उत्तरावर उलट प्रश्न व वादविवाद ऐकला जाणार नाहीं असें ठरविलें आहे. त्या अर्थीं बनारसच्या प्रश्नावरील परस्पर संक्षेप आरंभींच बंद केला पाहिजे आणि त्याची द्वितीय आवृत्ति निघूं नये.

* नामदार दादाभाईस हिंदुस्थानच्या घोर दारिद्र्याची सप्रमाण माहिती आहे तशी थोड्याच मुत्सद्यांस असेल. त्यांची य विषयांत बहुत परायणें झालीं आहेत. त्यांच्या विचारास बरोबर जुळणारा असा हल्लींचे फडणीस डेव्हीड बारबर यांचा एक गुप्त लेख दहा वर्षांपूर्वीं स्टेट सेक्रेटरी कडे धाडण्यांत आला होता. तो लेख उजेडांत आणण्या साठीं शेट दादाभाई यांचा भगिरथ प्रयत्न चालला आहे. अद्याप त्यांस जबाब असा मिळतो कीं तो लेख सरकारी गुप्त व विश्वासाचा असल्यामुळें जाहीर करूं नये असा हिंदुस्थान सरकारचा अति आग्रह आहे. नवल एवढेंच कीं दुसऱ्या सरकारी कागदोपत्रीं 'दशवार्षिकी हिंदुस्थानची सांम्पत्तिक स्थिती' असा ग्रंथ जगजाहीर करून त्यांत व्यापार वाढता आहे, लोक श्रीमान आहेत, आणि सुखी, व ऐश्वर्यसंपन्न आहेत, इंग्रजी राज्याची बळकटी व फैलाव हीं वृद्धि पावत आहेत असें बेधडक प्रतिपादन करण्याचा परिपाठच पडला आहे. आणि खरोखरची अंतस्थ स्थिति वरील गुप्त लेखांत निराळ्या स्वरूपाची वर्णिली आहे. खुद्द सर बेरिंग (हल्लीं लार्ड क्रामर) हे हिंदुस्थानचे फडणास होते तेव्हां त्यांनीं या देशांतील प्रत्येक माणशी सालिना २७ रुपययाचा आकार धरिला होता आणि याहून वाईट स्थितीचें चित्र सदर्हू गुप्त लेखांत असावें असा अंदाज आहे. नामदार दादाभाई यांनीं निरनिराळ्या आसनांचे एक कोष्टक तयार करून तो तक्ता स्टेट सेक्रेटरीपाशीं भरून मागितला तरी देखील नन्नाचा पाढा वाचण्यांत आला. परंतु नामदार मजकुरांची व त्यांच्या साह्यकर्त्यांची चिकाटी न सुटतां ते उत्तर मिळे पर्यंत स्वस्थ बसणार नाहींत अशी आमची पूर्ण खातरी आहे त्या गुप्त लेखावरून राज्य कारभारांतील पुष्कळ प्रश्नाचा उलगडा होण्या सारखा आहे. परंतु तो बाहेर येईल तेव्हां खरें!

आह्मांस लिहिण्यास अतिशय दुःख वाटतें कीं रा. रा. श्रीकृष्ण नरहर ऊर्फ बापू साहेब खापर्डे यांस जलोदराचे आजारानें गेल्या रविवारी ता. ११ जून रोजीं रात्रीं ९ वाजतां देवाज्ञा झाली. श्री. बापूसाहेब हे वऱ्हाडांत लहाना पासून मोठ्या पर्यंत सर्वांस माहित होते व बाहेर प्रांतींही ह्यांचा चांगला लौकिक होता. त्यांस पेनशन घेऊन तीन वर्षांवर ही अजून काळ गेला नाहीं तोंच मृत्यूनें त्यांचपावर घाड घातली. इतक्या लौकर त्यांचा असा अंत होईल असें कोणास ही वाटलें नव्हतें कारण बापूसाहेब चांगले सदृढ असत व त्यांस मेहनत करण्याची चांगली सवयही होते व ते स्वतः चांगले वैद्य होते. यांनीं गोर गरिब लोकांस आपल्या वैद्यकी ज्ञानाचा फुकट औषधि देऊन चांगला उपयोग केला. हे वऱ्हाडांत चांगले नावाजलेले अधिकारी होते. यांचे पुढें युरोपिअन अधिकाऱ्यांची कांहीं मात्रा चालत नसे व त्यांच्यावर चांगला दरारा असे कारण ते आपले कामात अतिशय दक्ष व लेखणीचे मजबूत असत. दृढ निश्चय व उत्तम वर्तणूक हे गुण बापूसाहेब यांचे अंगीं पक्के खिळले असल्यामुळें अति लहान पगाराचे नौकरी पासून पहिला वर्ग ए० अ० कमिशनरचे जागे पर्यंत त्यांस सरकारानें वाढवून त्यांचें गौरव केलें पोष्ट खात्यातील लहान पगाराचे जागे वरून त्यांची तरतरी व हुशारी पाहून त्यांस सन १८५३ सालीं जून महिन्यांत हैद्राबाद कंर्टिजंट फौजेचे कमानडर यांणीं त्यांस आर्मी क्लार्कचे जागीं नेमलें बंडाच्या वेळीं ते दिल्ली व झांशी इकडे लष्करा बरोबर गेले होते पुढें सन १८५७ सालींच उमरावती डे. कमिशनरचे इंग्लिश आफिसांत क्लार्क झाले लवकरच त्यांस ज्युडिशिअल शिरस्तेदारीच्या जागेची बढती मिळाली १८६२ सालीं त्यांस अॅक्टिंग तहसिलदार नेमलें १८६३ सालीं पोलीस इन्स्पेक्टरचें जागीं त्यांची नेमणूक झाली व १८६४ सालीं नागपूर डे० क०चे क्लार्क आफ कोर्ट नेमलें १८६५ सालीं त्यांस आकोले येथें पहिला वर्ग तहशिलदार केलें व १८६७ सालीं त्यांस ए० अ० कमिशनरचे जागेची बढती देण्यात आली. पेनशन घेते वेळीं ते फर्स्ट क्लास एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर होते. बापूसाहेब यांस विद्याव्यासंग फार होता. त्यांचे जवळ पुष्कळ मोठमोठ्या ग्रंथाचा बराच संग्रह आहे. त्यांचे मरणानें सर्वश्रुत लोकप्रिय व उदार असे त्यांचे चिरंजीव रा. रा. गणपतराव खापर्डे उर्फ दादा साहेब यांजवर एकदम दुःखाचा डोंगर कोसळला हें पाहून आह्मास अतिशयच दुःख वाटत आहे परंतु ईश्वर सत्ते पुढें कोणाचा उपाय! बापू साहेबांच्या मरणानें जुन्या व नव्या पिढी मधील एक मोठी सांखळी तुटली! परमेश्वर बापूसाहेब यांचे आत्म्यास सद्गति देवो अशी प्रार्थना करून हा दुःखकारक लेख आह्मी संपवितों.

महाराष्ट्रांतील सरदार मंडळी कडून राव बहादूर गणपत दामोदर पानसे फर्स्ट असिस्टंट कलेक्टर रत्नागिरी यांची मुंबई कायदे कौंसिलांतील सभासदा साठीं निवड झाली होती पण ती निवड बहुत करून नापास ठरेल असा रंग दिसतो. 'बहुमत' या शद्बाचा अर्थ कौंसिल आक्ट खालील नियमा अन्वयें मत देणाऱ्या पैकीं निम्मेजणांच्या मतांची संख्या धरली पाहिजे. हा नियम वरील निवडणूकीस बाधक होतो. शिवाय राव बहादूर पानसे हे सरकारी नोकर आहेत तेव्हां सरकारी नोकरास निवडूं नये अशी दुसरी तक्रार होती. मद्रासे कडे सरकारी नोकरास निवडू नये असा ठराव होत आहे तेव्हां तोंच या [इलाख्यास] लागूं होईल असें दिसतें. हें प्रकरण अखेर निकाला साठीं हिंदुस्थान सरकाराकडे रवाना करण्यांत आलें आहे. ही निवड रद्द ठरली तर सरदार मंडळीकडून दुसरी निवड होईल. आणि ती पाळी यावी ह्मणून जहागीरदार व सस्थानिक यांनीं मोठी खटपट चालविली आहे.

The Berar Samachar

MONDAY JUNE, 19, 1893

The annual report on the medical institutions in Berar for 1892 is an interesting record. These institutions are grouped in two classes—Civil hospitals and Charitable dispensaries. There are in the province 44 dispensaries of which eight are the civil hospitals. The current year makes an addition of two charitable dispensaries—one at Badnera and the other at Sirpur. The civil hospitals are intended mainly for Government servants though medical relief is not refused to others who apply for it. These hospitals are maintained by the state and therefore call for no remark as regards the fund supplied to them.

The number of patients treated at the hospitals is increasing from year to year and is within the reach of a good round figure of half a lac if the current year raises the total of 1892 by some 3000 patients. It is a good point of note that the expenses incurred on account of 47776 out—door and in—door patients amounts to a little less than Rs. 50,000; while the patients treated at the Charitable dispensaries were 2,48,315 and the sum spent on their account is about Rs.52375.

The Civil Hospital at Akola is practially more a burden than an useful institution. The Charitable dispensary of the place is within a small distance of the general public and is in the central place of the city. Patients resort as a rule to the latter and it is only under some constraints that they go to the Hospital. Mr. Plowden had therefore in view the amalgamation of the two dispensaries in order to make one really living and useful institution of the two; and Dr. Swaine—the officiating Inspector—General informs us that steps have been taken towards the end and plans and estimates of making the charitable dispensary large, commodious and comfortable are under consideration. The change that we are likely to have in the course of a few years will meet with a hearty welcome from the public since it will consolidate the medical staff and store at one dispensary and widen the sphere of their usefulness.

There were in all 397 surgical major operations of which 174 were scored by the civil hospitals. Doctor Reilly, apothecaries Morrison and Montgomery, and Hospital assistants Syed Ismail, M. Doorgiah Pillay, and Poonambalum, deserve special mention for the number of operations performed by them is above twenty each. Doctor Roe who generally secures a large number of them was on leave for three fourths of the year and has still against his name the comparatively large number of 17. We are aware that it is dangerous to weigh merit by mere numerical calculations; but at the same time a large figure shows that the doctor who performs the operations has an established repute sufficient enough to attract patients to him. It cannot be unless he is more or less successful in the long run. If no special comments on the major operations by each individual come forth and no merit is distinguished in the remarks upon them we have no other standard available than what the figure indicates as to the medical skill and practice of a gentleman. The Civil Surgeon of Ellichpur has adverted to the danger of allowing hospital assistants to perform many of the graver surgical procedures. Dr. Swaine

shares in his fear and recognizes the great want of our dispensaries as regards a sufficient number of surgeons—one to give chloroform and another to operate. Instead of two surgeons and several assistants at one operation there is in a dispensary a hospital assistant 'with perhaps the only aid of a compounder and bhisty'. Dr. Swaine dismisses the ideal of a well—equipped dispensary as unpractical under the present circumstances and notifies to Dr. Doyle the Civil Surgeon of Ellichpur that he would 'encourage the practice of surgery where hospital assistants have the nerve and knowledge for the work'. It is besides satisfactory to note that students from the medical school at Hyderabad under the management of Dr. Lawrie well—known in the Chloroform—Commission are of good attainments and the Inspector—General hopes to entrust them with the surgical work with some certainty of success.

Dr. Swaine has ably pointed out the unsound and unwarrantable nature of the inferences that are generally based upon the statistical figures in a return of patients both out—door and in—door that are treated at dispensaries. While noticing an average rise in the total number of patients treated in spite of a fall in the figures of Akola and Ellichpur districts he makes a worthy observa—tion by way of explanation of the decrease.

It is earnestly hoped that the directions left here for future guidance of the civil surgeons will be followed with great exactness and diligence by the Inspecting officers when on tour. Mr. Plowden makes it a point of order to enjoin on Civil Surgeons the utmost vigilence in examining the registers kept at a dispensary.

By the by we may note here that the recent levy of fees for medical treatment and medicines have told upon the average attendance of patients. It is the middling classes who are neither rich enough to pay for the medical relief nor poor enough to beg it for nothing. To attend a dispensary in *forma pauperis* is a trying procedure for them. They would rather not take in medicine than to apply with that stamp of pauperism. It is these people who are to be viewed with cautious indulgence and generous goodness. Those who live above want care not for fees while those who are beset with penury care not to beg for alms. The masses that skim between poverty and prosperity are the victims of the introduction of levying fees. The present mode of demanding fees we utterly dislike. Even we would suggest a new addition to the town-found duty. Such an increase in the local tax upon income, however unwelcome on main principles, we would propose because we think it to be the duty of the leisured classes in a society to pay for the food, clothing and medicine of the people in lower strata, in some form or other. We wish to take up the point at some other time but we would close this time with the remarks of the Resident and Commissioner upon the subject:—

*"subscriptions and payments for attendance.*—It is a noteworthy fact that our hospitals and dispensaries in India are unfortunately too often resorted to by hundreds of people who are in a position to pay a small fee to the medical officer. The prevailing idea among this class of patients is that as the Medical officer is a Governmen servant, and the hospital a Government institution, gratuitous medical aid cannot be refused. Except in urgent cases, when treatment should of course at once be given, all persons, except the really poor, should the Resident thinks be made to pay fee, and it was with this view that rules for levying fees were introduced into the Amraoti and Akola dispensaries in 18890 and 1891. The application of the principle has lately been extended to twelve more dispensaries. It is not clear from the report whether they have been introduced into the dispensaries at Anjangaon, Chandur, Umarkhed and Wun as sanctioned in Secretary for Berar's letter No. 4148, dated the 14th December 1892, but in any case the Resident desires to know whether further effect cannot with advantage be given to the orders contained in paragraph 8 of the last year's report.

The idea of seeking to obtain regular annual subscriptions of small amounts for the dispensaries strikes the Resident as sensible, but he regards the application of the new fee rules to all the dispensaries in which they can be fairly worked as the best method of getting a reasonable return for work done from those who have no claim to gratuitous help. Donations should be obtained wherever} possible and be treated not as revenue but as capital, and the Commissioner should see that all funds available for investment (paragraph 22 of the report) are dealt with in this way as speedily as possible. The plan of throwing a larger share of the cost of dispensaries upon local bodies by fixing the Government contribution upon an average of years is, the Resident believes, right in principle, but its application must be based upon an equitable consideration of all the facts, so as not to press too hardly upon the funds of the several District Boards."

Colonel Mackenzie expresses his view upon the matter in the following lines:—

"In fact, I believe that as long as we hold out facilities for those who can afford to pay to get their medicines and treatment for nothing, we are acting suicidally, as thereby we bar the door to private practitioners. If the well-to-do part of the population were driven to pay, it would be the best possible check on, and tend to improve, our Hospital Assistants; for then, if they did not give satisfaction, the public in some places at once, and in all places sooner or later, would turn to private practitioners. In my view of the present position even "the perambulating quack," in one place referred to by Surgeon—Major Swaine, has his uses and is not to be utterly despised."

---

In condemning the system of saddling India with the home—charges the Bombay Gazette has remarked thus:—

"In the course of fourteen years these payments raised the Home Charges enormously—"an increase which was not less than four millions sterling." After that, matters, says Lord Northbrook, went "from bad to wrose," and in 1874 a Committee of the House of Commons was appointed to inquire into the subject. In their report the Committee strongly insisted "on the unspeakable importance of strict impartiality in all financial arrangements between India and Great Britain." But the House of Commons showed no enthusiasm for the relief of Indian taxpayers. Nothing has been done in the matter since, though on all hands it is admitted that India has to pay too much. It is true that Lord Kimberley is able to declare, with the approval of the House of Lords, that India can in case of emergency get all the aid she may require for her defence. It is undoubtedly of vast importance that India can' count upon reserves in the hour of peril without keeping an immense army on foot in times of peace, as other military Empires find it necessary to do. But that consideration does not lighten the very real and oppressive burden of having to pay Home Charges year in, year out, largely in excess of the value received."

But even in this state of bankruptcy Lord Kimberley has boldly burdned India with an aggregate amount of thirty lacs of Rupees to be paid by twenty annual instalments. This sum is, it is said, the share of India to defray the expenditure of the new telegraphic cable from the Mauritius islands

---

We reproduce below the advice given to young men by Mr. Gladstone:-'Be sure that every one of you has his place and vocation on this earth and that it rests with himself to find it. Do not believe those who too lightly say nothing succeeds like success. Effort,-honest, manful, humble effort, succeeds by its reflected action, especially in youth, better than success which, indeed, too easily and too early gained, not seldom serves, like, winning the first throw of the dice, to blind and stupify. Get knowledge all you can. Be thorough in all you do and remember that though ignorance often may be innocent, pretension is always despicable. Be strong and exercise your strength. Work onward and work upward, and may the blessing of the Most High soothe your cares, clear your vision and crown your labours with reward." P.

---

## वऱ्हाड.

हवामान— पाऊस चांगला होऊन मृग शीतळाई आली आहे. पेरण्याच्या कामास सुरवात झाली आहे. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

अडगांव मुक्कामीं एका स्वरूपवान चांभारणीशीं कांहींजणांनीं व्यभिचार केल्यावरून तेथील ब्राह्मण, माळी, कुणबी इत्यादि लोकांमध्यें ग्रामण्य झालें होतें. त्यांत बहिष्कृत झालेल्या पक्षाकरवीं एक बेअब्रूचा खटला करण्यांत आला होता. त्या खटल्यांत फिर्यादीचा पक्ष पहिल्या कोर्टांत सरसावला परंतु अपिलांत आरोपी दोषमुक्त झाला. अडगांवच्या लोकांस आह्मी सुचवितों कीं त्यांनीं घरच्या घरीं ग्रामण्य मोडून परस्परांची समजूत घालावी आणि त्यांतच त्यांचा शहाणपणा आहे.

'वृश्चिक दंशावरील अजब वल्ली'— ही वल्ली रा. रा. नारायण गणेश मंडलीक म्यानेजर सुधाकर प्रेस, पेण जिल्हा कुलाबा यांच्या कडून आह्माकडे नजराणा आली आहे तिचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. विंचवाच्या विषाची बाधा ही कांडी दुरून दाखविल्यानें क्षणार्धांत नाहींशी होते असें ते ह्मणतात. या कांडीचा आह्मास अनुभव घेऊन पहावयाचा आहे तर ज्या कोणास विंचू डसेल त्यांच्यावर आह्मी या वल्लीचा प्रयोग मोठ्या संतोषानें फुकट करूं. पेणहून मागविल्यास ती तेरा आण्यांस मिळते.

---

नोटीस

रा. रा. बळवंत विनायक दिगंबर राहणार अकोले यांस खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमची नोटीस पावली. सदर्हू इमारतीचे पाणी आमचे मालकीचे जागेवर पडत आहे. आपण दिलेल्या नोटिसींतील मजकूर खरा नसल्या कारणांनीं आह्मी कोणत्याही संबंधानें खर्चाच्या बाबतींत जबाबदार नाहीं. ता. १८।६।९३ इसवी.

( सही ) मल्हाद नारायण तारे राहणार अकोलें दस्तुर खुद.

---

नोटीस.

रा. रा. भोनाजी वल्लद बाहादूरजी पाटील राहणार मौजे काळखेड तालुके खामगांव यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं. तुमचे कडे आमचीं खाते बाकी येणे होती त्याज बद्दल आम्ही स्मालकाज कोर्टांत फिर्याद करून तुम्हांवर समनस बजाविलें नंतर तुम्ही समक्ष येऊन सदर्हू फिर्यादी बद्दलचा निकाल करून त्या बद्दल सही करून दिल्ही व रुपये पाच साहा महिन्यांनीं सदर्हू फिर्यादीचे रुपये देण्याचे कबूल केलें परंतु आजपर्यंत दिल्हे नाहीं. व या शिवाय तुम्हीं आमचा तंबु येक १ किंमत रुपये १५० दिडशेचा नेला आहे तो हा आज पावेतो परत केला नाहीं. याज करिता या नोटीसिनें तुम्हांस असें कळवितो कीं सदर्हू फिर्यादीचे रुपये व नेलला तंबु नोटीस पावल्या पासून आठदिवसाचे आत तंबु व फिर्यादिचे रुपये असे आणून देऊन निकाल करावा नाहींतर फिर्यादिचे रुपये व तंबुचे रुपये १५० दिडशे याज बद्दल कोर्टांत दावा करून या नोटीसिचे खर्चा सह भरून घेऊन म्हणून दिल्ही नोटीस ता० १७।६।९३ इ०.

सही
बाबुरावजी सखारामजी देशमुख
तर्फे मु. गोविंद अंताजी
चितळे दस्तुर खुद.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणें.

दि. कि. मो. नंबर ९/१८९३

डेपुटी कामिशनर साहेब बहादूर जिल्हे इलिचपुर यांचे कोर्टांत.

नांव ढेबुलाल
बापाचें नांव गोविंदराम आ. पा. आई
जानकीबाई तर्फे मु० चुनीलाल
राहणार—वडनेरगंगाई तालुके दर्यापूर.
जिल्हे—इलिचपूर यांस मयत.

गोविंदराम पुरणलाल राहणार वडनेरगंगाई तालुके दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज कारितां सदर्हु मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता. ९ माहे जुलई सन १८९३ इ० रोजीं सदर्हु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं स्वारी असेल तेथें या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी. आज ता. २६ माहे ४ सन १८९३ इ.

( Signed) W. Hastings
Deputy Commissioner
Ellichpur District
उपहज्य.

---

## वर्तमानसार

कारवारा पर्यंत रेल्वे करण्याचा सरकारचा जो बेत तो लवकर तडीस न्यावा अशा बद्दल कारवारच्या लोकांनीं सभा भरवून सरकारास अर्ज केल्याचें समजतें.

भोपाळच्या बेगमसाहेब सिमल्यास जावयाच्या आहेत.

मद्रासचे ब्राऊन नांवाचें गोरे बारिष्टर वेडे होऊन इस्पीतळांत पडले आहेत. अतिबुद्धीचा हा परिणाम होय.

सहारणपूर येथील पाद्री लोकांच्या शाळेस आग लावून ती जाळून टाकली! हा किता आमच्या धार्मिक लोकांस माहीत होणें पाद्री लोकांस बरें नाहीं.

गंगावरम येथील लक्ष्मीसिंह नांवाच्या वकिलास त्याच्या गुमास्त्यानें ठार मारलें असें समजतें.

काश्मीरापर्यंतच्या रेल्वेची सर्व्हे पुरी होऊन कामास सुरवात होण्याची वेळ आली आहे.

लार्ड राबर्ट यांस विलायतेस एक मेजवानी झाली त्यावेळी त्यांनीं सांगितलें कीं हिंदु लोकांना नीट रीतीनें वागविलें वर ते इंग्रज सरकारा करितां जीव देण्यास कधीही मागे पुढें पहाणार नाहींत! मधली 'तर' नाहींशी होईल तेव्हां ना?

पुणेवैभव०

मद्रासइलाख्यांत सोन्याची खाण सांपडली.

मणीपुराकडे पर्जन्यानें अनर्थ उडऊन जलप्रलय केला.

तुर्कस्थानांतील फौज यार्कंदकडे रवाना होणार आहे.

यार्कंद येथील इंग्लिश एजंटास चीनी लोकांनीं ठोकल्यामुळें अधिक लष्करी लोक रवाना करण्याचा घाट दिसत आहे.

निजाम हैद्राबादचे दिवाणगिरीवर हैसूरचे दिवाण शेषाद्री अय्यर यांस देण्याची वाटाघाट चालली आहे. म० मि०

पेण येथें मि. टिळक यांच्या घरांत सात आठ हत्यारबंद मंडळी शिरून मि. टिळक यांस रक्तबंबाळ केलें असल्याचे समजतें.

होळकर सरकार शिकागोचे प्रदर्शन पहाण्यास जाणार आहेत अशी इंदुरास दाट वदंता उठली आहे. सु० प्र०

सिव्हिलसर्व्हिसची परीक्षा इंग्लंडांत व हिंदुस्थानांत बरोबर व्हावी. आनंदाची गोष्ट आहे.

मुंबई व मद्रास येथील कमांडर–इन–चीफच्या जागा कमी करण्याचा ठराव झाला.

लिव्हरपूल येथें कापसाचा व्यापार बुडत चालला आहे.

दारूमध्यें जो अमली पदार्थ असतो तो सुंठीच्या अर्कांत त्यांच्या दुप्पट असतो.

पुरुषाची उंची ४० वें वर्षीं पुरी होते. स्त्रियांची ५० वे वर्षीं होते.

आस्ट्रेलियांत जे सुरवंट आहेत, त्यांची लांबी ६ इंची पासून एक फुटापर्यंत असते.

वनस्पतीमध्यें कांद्यासारखा पौष्टिक पदार्थ दुसरा कोणताही नाही.

जर्मनीतील बहुतेक वर्तमानपत्रांचे मालक व एडीटर ज्यू आहेत. कर०

मुंबई म्युनिसिपालिटीबद्दलच्या अक्टांत दुरुस्ती करण्याचा विचार चालू आहे.

अलाहाबादचा तार सांगत कीं, एका मजिस्ट्रेटनें एका कैदीस शिक्षा सांगताच कोडतांतल्या एका माणसानें पायांतला जोडा काढून माजिस्ट्रेटास फेकून मारिला.

कारन जिल्ह्यांत दुष्काळाचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत व त्याकरतां सरकारची तजवीजही चालू झाली आहे.

चिकागो प्रदर्शनांतील बक्षीस देण्यासारखे पदार्थ कोणते हें ठरविण्याचें काम एका माणसाकडे असल्यामुळें लोकांस राग आल्यावरून त्या कामास आतां पंच नेमले आहेत असें सांगतात.

पारीसच्या बातमीवरून समजतें कीं सायमसरकारानें आपलें एक महत्वाचें ठिकाण, फ्रान्सच्या स्वाधीन केलें.

अमिराची फौज हाजारा लोकांवर गेल्याची बातमी हिंदुस्थानसरकारास अजून कळली नाहीं.

पर्शियाच्या कांहीं प्रजेनें बादशहाच्या विरुद्ध बंडावा चालविला आहे. राज्यकारभारांत अमुक प्रकारची सुधारणा असावी असें त्यांचें ह्मणणें आहे.

अफगाणचा अमीर व हजारा लोक यांच्या दरम्यान लढाया चालू असून कांहीं हजारी कैदी काबुलास रवाना झाले आहेत.

पर्शियनसरकारानें आपल्या हद्दीत ९९ वर्षांच्या करारानें रेल्वे करण्याचा एका रशियन व्यापाऱ्यास मक्ता दिला. ठा०अ०

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोले म्युनसीपल कमेटीचे हद्दींतील बारा फतराचे आंत गुरें चारण्याचे हक्कांचा लिलाव सन १८९३।९४ इसवी साला बद्दल ता. ९ माहे जुलई सन १८९३ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू तारखेस सदर्हू वेळीं टौनहालांत हजर व्हावें कळावें ता. १०।६।९३

G. A. Vaidya<br>For Secretary<br>A. M. C.

नोटीस

रा. रा. जैराम अप्पा वल्लद रामाप्पा उर्फ ढुनढुन आप्पा राहणार कजबे खामगाव जिल्हे आकोला यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तारीख १३ माहे दिसेंबर सन १८९१ इसवी रोजीं तुह्मी मला स्टांपावर करारनामा लिहून दिला कीं, दोन महिन्याच्या आत जुन्या पाटगी बद्दलचें कर्ज रुपये १०० शंभर देऊन टाकतो आणि तुला घरीं नांदविण्यास नेतो. पण त्या प्रमाणें तुह्मी गेल्या दीड वर्षांच्या मुदतींत कांहीं केलें नाहीं. तुमच्या करारनाम्याची मुदत चुकली आणि त्या अर्थी तुह्मी त्या लिखानें मी दुसरा घरठाव केल्यास मजवर फिर्याद अर्याद करूं शकत नाहीं. तुह्मी पंचांचे गुन्हेगार ठरला आहां. तुह्मी हल्लीं कामधंदा न करितां बेरोजगारी राहतां माझा सांभाळ करण्यास तुमच्यां अंगीं ताकद नाहीं. व तुमची इच्छाही दिसत नाहीं आतां माझी शेवटची विनंती एवढीच आहे कीं मी नांदण्यास तयार आहे. मागील पोटगी बद्दलचे स्टांप कागदांतील कर्ज रुपये १०० व त्यानंतर आज मित्ती पर्यंतचे रुपये ७५ मिळून १७५ रुपये व नोटीशीचा खर्च देऊन मला घेऊन जावें. नोटीस पोंचल्या पासून आठ दिवसाच्या आंत या प्रमाणें केलें नाहीं तर तुह्मी करारनामा मोडल्या कारणानें त्यांतील शर्तीं प्रमाणें दुसरा घरठाव करीन. आणि त्या नंतर तुमचा नवरेपणाचा हक्क कांहीं रहाणार नाहीं. लाचार होऊन मी ही नोटीस दिली आहे. कळावें. तारीख १३ माहे जून सन १८९३ इसवी.

( सही.)<br>निशाणी बांगडी–रावी मर्द जैराम आप्पा लिंगाइतवाणी राहणार हल्लीं मलकापूर—<br>लक्ष्मण वा॥ पुंजाप्पा दलाल मलकापूर यांच्या घरीं.

नोटीस

रा. रा. रामदीन वल्लद खरकराम राहणार हल्लीं अकोट यांसः--

जानकी मर्द रामद्दीन इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे आहा व तुमचे माझ्याशी लग्न झाल्या तारखे पासून चांगुलपणा मुळींच रहात नव्हता आतां सरासरी दहामहिने झालें मजला तुह्मी आपले खुषीनें घरांतून काढून दिलें. व मजला निर्वाहा करितां बिल्कूल साधन नव्हतें. व तुह्मास मी टपालमार्गीनें नोटीस ही दिली होती परंतु आपण ती घेतली नाहीं. ह्मणून मला ती वापस मिळाली. नंतर पाहिजे त्या मनुष्याच्या हातचा खाना खाणें मला भाग पडलें. व चारपांच माहन्यापूर्वीं तुह्मी मजविरुद्ध पोलिसांत खोट्या गोष्टी प्रसिद्ध केल्या पण त्यांत कांहींच झालें नाहीं. तुह्मीच खोटे ठरला. आतां तुह्मास या नोटिशीनें मुद्दाम कळविलें जातें कीं, ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत माझा बंदोबस्त करून मजला घेऊन जावें. तसें न केल्यास तुह्मी मला आपखुषीनें घरांतून काढून दिल्यामुळें मी तुमची बांधली राहिली नाहीं. ह्मणून मी आठ दिवसांची मुदत संपल्यावर दुसरा घरठाव करीन. हे तुह्मास कळविलें आहे. तारीख १४ माहे जून १८९३ इ०

( सही. )<br>जानकी मर्द रामदीन राहणार अकोट. निशाणी बांगडी.

नोटीस

रा. रा. रंभाजी वल्लद दत्ताजी कुणबी गोमाशे राहणार कौलखेडे तालुके अकोलें तर्फे ह्मसांग यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीशीनें कळविलें जातें कीं, तुह्मी आमचे खातेचें शेत कोलखेडे येथील सर्वे नंबर ९ एकर २०वीस गुंठे १ अकार रुपये (३३) तेहतीसचे गेल्या वर्षीं वहीवाटीस घेतलें होतें. तें शेत आह्मी तुह्मास वहितीस वगैरे देण्यास खुश नाहीं. जर तुह्मी सदर्हू शेतांत आमचे परवानगी शिवाय वखर वगैरे नेलें अगर पेरलें त्याबद्दल नुकसानी रुपये २०० दोनशें घेऊ व या नोटीशीचा खर्च वगैरे सर्व नुकसान भरून घेतलें जाईल. ह्मणून दिली नोटीस सही कळावें. ता० १५ माहे जून सन १८९३इ.

( सही मारवाडींत. )<br>बक्षीराम रुडमल मारवाडी राहणार ताजनापेठ अकोलें दस्तुर खुद्द.

नोटीस

श्री शंकररूप महाराज गुणसंपन्न ऐश्वर्यांभी रा. रा. मारोतीसा भवानसा रंगारी दुकान बाळापूर यासी आपली दासी अर्धांगी लक्ष्मी जवजे मारोतीसा चरणारविंदी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विनंती विशेष. आपण गंधर्वाचें कुटुंब केले दिवसा पासून मला फार त्रास देता व मारहाण करता त्या योगें मी फार त्रासून गेली आहे. त्याजबद्दल कांहीं दुःख मानीत नाहीं. कारण आपण मज देव आहात. सोनाबाईचें आमचें जमें नातें आहे, तशीच सोनाबाईनें करणी करून दाखविली. हें आमचे कर्माचें फळ! बाईसाहेबाच्या सांगण्यावरून मला घरांतून काढून दिलें आणि खाण्यासही देत नाहीं. व ह्मणतां कीं दुसरा नवरा करा; मी फारकती देतों. असें ह्मणणें आपणास शोभत नाहीं व मीही फारकती घेत नाहीं. भवानसानीं जन्मकाळा पासून अंतकाळा पावेतों जी कीर्ति मिळविली आहे त्या कीर्तीला अगदीं कलंक लावण्याचा हेतु आपला आहे. आणि असें केल्यानें कलंक लागेल हे निश्चित गोष्ट आहे आणि मी जर फारकती घेतली तर भवानसांचे कीर्तीला व आपले जीविताला धक्काच बसेल परंतु माझी स्त्रीबुद्धी च ह्मणतील परंतु आपली प्रौढव पोक्त बुद्धी आहे ह्मणून मला सरकारांत जायाचें काम पडणार नाहीं. आपण मला राहण्या करितां चांगलें सोईचें घर, अन्नवस्त्राचा खर्च इजती प्रमाणें दरमहा २५ पंचवीस रुपये द्यावा. व अंगावरील सर्व दागिने सणतिवाराचा कपडाही द्यावा. मी व माझी कन्या गंगू आह्मी दोघीही रोगानें फार जर्जर झालोंत. त्याजबद्दल खर्च सुमारें १०० शंभर रुपये देणें. गंगूबाईचे सोयरीकीचा व लग्नाचा खर्च वेळेशीर देण्याचें कबूल व्हावें व आपण घरांतून काढून दिले दिवसापासून अन्नवस्त्रा करितां कर्ज काढलें तें आपणास देणें लागेल. आपण जरी घरीं बोलावून पहिल्या प्रमाणें चालूं द्या असें ह्मणाल तरी मी कबूल करीत नाहीं. कारण ज्या ठिकाणीं सवत बुद्धि आहे त्या सवतबुधी मुळें जिवास फार भय आहे. या जिवाचे भितीस्तव वेगळे राहण्यास घर व अन्न वस्त्राचा खर्च घेईल ह्मणून अपणास प्रसिद्ध नोटीस दिली आहे. नोटीस पावल्या तारखे पासून सात ७ दिवसांत निकाल करावा. सदर्हू मुदत संपतांच रीती प्रमाणें तजवीज करीन नोटीशीचा खर्च व अखेर निकाल होईपर्यंत जो खर्च लागेल तो तुह्मास देणें भाग आहे. ह्मणून दिली नोटीस ता० १२।६।१८९३ इ०

( सही )<br>लक्ष्मी जवजे मारुतीसा रंगारी बाळापुर निशाणी खुद्द हातची बांगडी.

☞ हें पत्र आकोले येथें कै० रा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१२
सहामाही ,, ३ ,, ०।८
सालअखेर ,, ७ ,, १।०
किरकोळ अंकास .................... ४

Rs.
Annum in advance 5 Postage 13as
Annum in arrears] 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy.......................1as

नोटेशीनबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ......०।१

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.


VOL. XXVII AKOLA MONDAY 26 JUNE 1893 NO. 25

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख २६ माहे जून सन १८९३ इ० अंक २५



## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूंतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार यां पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळलें. शारीरीक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उवड्या हवेंत राहणे, गुप्तस्त्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गुण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें ताबडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासिनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेत सल्का मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पद्दाटेंसे थकवा घेऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरि होणें परमं व गुप्तस्त्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारिरीक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळलेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवुं लागतें. ह्या विषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनिय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूचा जबरदस्त शक्ति वाढविणारें टॅनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवाना व स्नायूंना ज्ञानतंतु योगानें पूर्व स्थितीवर आणणारे शक्तिदायक सत्व पोंहोचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कर्मांच्या योगें शरिरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जेंवर ज्ञानतंतूची अशक्तता साधरण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हे औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून रहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूंची अशक्तता हीच रोगाचीं कारणें असतील तों पर्यंत क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clements.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधागिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक 'नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणिं दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कैंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बेगन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकान.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.


## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोले म्युनसिपाल कमेटीचे हद्दींतील बारा फतराचे आंत गुरें चारण्याचे हक्कांचा लिलाव सन १८९३।९४ इसवी सालाबद्दल ता. ५ माहे जुलई सन १८९३ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हु तारखेस सदर्हु वेळीं टौनहालांत हजर व्हावें कळावें ता. १०।६।९३ इ.

G. A. Vaidya
For Secretary
A. M. C.

## शिक्षण पद्धति

( एका अनुभवी शिक्षकाचा धडा )
नकाशा- नंबर २
सन १८९२चे ५०वे अंकावरून पुढें चालूं)

गुरुजी–मुलांनो मागील खेपेस, तुह्माला आपल्या या खोलीची आकृति पाटीवर किंवा फळ्यावर काढावयास शिकविली. आज मी तुमच्यापाशीं त्याच विषयावर बोलणार आहे. तुह्माला दुसरें पुस्तक वाचतांना दिशांची माहिती झालीच आहे. तर आतां सांगा पाहूं, ही खोली पूर्वपश्चिम लांबोडी आहे, किंवा दक्षिणोत्तर आहे.

सदू–पूर्वपश्चिम लांब आहे, गुरुजी.

विठू–आणि दक्षिणोत्तर रुंद आहे.

गुरुजी–ठीक. आतां खालचे वर्ग बसण्याच्या ज्या खोल्या आहेत त्यांची लांबी रुंदी मोजून एक यार्डास एक इंच या प्रमाणें दिशा साधून आपल्या पाट्यांवरून काढून दाखवा पाहूं.

मुलांनीं पाट्यांवर आकृति काढून आणिल्यावर

गुरुजी–तुमच्या आकृति बराबर आहेत. परंतु तुह्माला एक गोष्ट सांगावयाची राहिली आहे; ती ही कीं, एखाद्या पदार्थाची अथवा स्थळाची आकृति आपण कागदावर अथव फळ्यावर अथवा पाटीवर काढीत असतां, त्या फळ्याची, किंवा कागदाची अथवा पाटीची वरची बाजू ती उत्तर दिशा. खालची बाजू ती दक्षिण दिशा, उजव्या हाताकडील पूर्व दिशा आणि डाव्या हाताकडील पश्चिम दिशा असें समजावें.

गणू– मी वरची बाजू पूर्व धरून आकृति काढून दाखविली यांत काय चुकी झाली, गुरुजी!

गुरुजी–चूक कांहीं नाहीं. परंतु एकदां जी रूढी पडली, व सर्वत्र मान्य झाली, ती मोडणें ह्मणजे चूकच आहे. माझ्या हातांत हें पुस्तक आहे, याला पुस्तक कां ह्मणावें? दगड ह्मटलें तर नाही कां चालणार? प्रथम शब्द प्रचारांत आले, तेव्हां ज्याला आपण पुस्तक ह्मणतों, त्याला दगड ह्मणण्याची रूढी पडली असती, तर आज आपण त्याला दगड ह्मटलें असतें, असो. वरची बाजू ती उत्तर दिशा मानण्याची चाल सर्वत्र आहे, ती आपण मान्य केली पाहिजे. एरवीं वरच्या बाजूस दक्षिण किंवा पूर्व मानणें यांत वावगें कांहीं नाहीं.

सदू–गुरुजी, ही पहा मी आपल्या पाटीवर आपल्या घरापासून शाळे पर्यंत रस्त्याची व त्याच्या दुतर्फा घरें आहेत त्यांची आकृति काढून आणली आहे. ती बरोबर आहे का?

गुरुजी—वरवर पाहण्यांत ही तुझी आकृती बराबर आहे. परंतु अमळ बारकाईनें पाहिलें असतां यांत पुष्कळ चुका निघतील. कारण तूं रस्त्याची रुंदी, तसेंच घराची लांबीरुंदी मोजून कोठें आणिली आहेस? हें पहा, सदू, तांबोळ्याचें दुकान किती लहान आहे, तथापि तें तूं हरि शिंप्याच्या दुकाना एवढें दाखविलें आहेस. असो; केवळ अनुमानानें काढण्यांत कुशळ चित्रकारांच्या ही चुका होतील, तुमची काय कथा? तथापि मी तुह्माला फक्त शाळेचा आकार कसा काढावा हें दाखवीत असतां, तूं गांवातील एका रस्त्याचें चित्र काढून आणिलेस, हें शाबासकी मिळण्यासारखें काम केलेंस, यांत संशय नाहीं.

रामा—गुरुजी, माझ्या घरीं एका नळकांड्यांत कागदाची वळकटी आहे. त्यांत चौकोनी तिकोनी अशा वेड्या वांकड्या रेषा आहेत. मधून मधून फुल्या आहेत. त्याला माझा बाप नकाशा ह्मणतो अणि त्यांत घोटें बांध वरुळ्या विहिरी आहेत ह्मणतात. हें खरें आहे काय?

गुरुजी–अरे तो आपल्या गांवचा नकाशा आहे. तुह्मी आतां शाळेचा आकार काढून दाखविलात, तो शाळेचा नकाशा. सदूनें एका रस्त्याचा नकाशा काढून दाखविला त्या प्रमाणें एखाद्या घराचा अथवा रस्त्याचा नकाशा काढितां येतो, त्याच प्रमाणें गांवाचाही काढितां येतो. रामा तुझ्या बापापासून तो नकाशा तुह्मांस दाखविण्या करितां मी मागून आणिला आहे. कपाटांतून तें नळकांडें इकडे आण पाहूं, सदू.

गुरुजी नकाशा उघडून फळ्यावर टांगतात आणि गांवांतील सर्व प्रसिद्ध स्थळें मुलांस दाखवितात. तीं स्थळें एकमेकांपासून किती दूर व कोणत्या दिशेस आहेत, तें समजून देतात.

सदू–हा नकाशा कोणी काढला गुरुजी? ज्यानें हा नकाशा काढला त्याला प्रत्येक शेताची लांबी रुंदी कशी समजली?

गुरुजी– हे नकाशे सरकारी आहेत. सरकारानें जमिनीची मोजणी करून कोणत्या जमिनीचा किती सारा द्यावा हें ठरविलें आणि प्रत्येक गांवा खालच्या सर्व जमिनीचा नकाशा काढिला. प्रत्येक गांवच्या नकाशाची एक प्रत त्या गांवच्या पाटलांपाशी दिली असते. त्यांत गांवठाण ह्मणजे घरें बांधण्याची जागा, सर्व पडित आणि वाहित जमीन, रस्ते, बांध वरुळ्या दाखविल्या असतात. या नकाशांच्या योगानें शेतीच्या हद्दीचे झाले असतां त्यांचा निकाल करणें अगदीं सोपें झालें आहे. असो जसा हा एका गांवाचा नकाशा आहे, तसा तालुक्याचा ही नकाशा असतो. हा पहा मी तहसीलें कचेरींतून तुह्माला दाखविण्या करितां आपल्या तालुक्याचा नकाशा आणिला आहे.

विठू– आपल्या या लहानशा गांवाचा नकाशा तालुक्याच्या नकाशापेक्षां मोठा आहे.

गुरुजी–विठू या या दोन्ही नकाशांत हें काय लिहिलें आहे तें वाचून पहा आधीं.

विठू– ( वाचून पाहून ) हां गुरुजी समजलों गांवाचा नकाशा १०० यार्डास एक इंच या प्रमाणानें काढिला आहे. आणि तालुक्याच्या नकाशांत एक इंच जागेंत चार मैल आहेत असें समजावयाचें.

गुरुजी– ठीक, मुलांनो, या वरून ही गोष्ट तुम्ही लक्षांत ठेवावी कीं नकाशाच्या आकारावरून क्षेत्राच्या आकाराची कल्पना करितां येणार नाहीं. एकाच क्षेत्राचे नकाशे निरनिराळ्या प्रमाणांनीं लहान मोठे काढितां येतील. आपल्या गांवाचा नकाशा १०० यार्डास एक इंच, हें प्रमाण धरून काढिला आहे, १००० यार्डास एक इंच या प्रमाणानें तोच नकाशा काढिला, तर याच्या दशांश इतका लहान आला असता. या भिंतीवर वऱ्हाडचा, हिंदुस्थानचा एशियाचा आणि पृथ्वीचा इतके नकाशे टांगून ठेविले आहेत, व त्यांचे आकार बहुतेक सारखेच आहेत तथापि. ज्या स्थलांचे ते नकाशे आहेत तीं स्थलें सारखीं नाहींत. वऱ्हाडांत २२ तालुके मावतात. वऱ्हाड प्रांतासारखे अनेक प्रांत मिळून हिंदुस्थान देश झाला आहे. हिंदुस्थाना सारखे अनेक देशमिळून एशियाखंड होतें. व पृथ्वीचा नकाशा ह्मणजे एशिया सारख्या चार खंडांचा नकाशा होय. असो. आतां तुह्मांला नकाशा ह्मणजे काय व ते कसे काढितात हें समजलें. दुसऱ्या एखाद्या वेळेस याच विषयावर आपण बोलूं.

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक आषाढ शुद्ध १३ शके १८१५

सिव्हील सरव्हिसची परीक्षा विलायते प्रमाणें हिंदुस्थानांतही घेतली जावी ह्मणून मि. पाल यांच्या सूचने वरून हाऊस आफ कामन्सचा बहुमतानें ठराव झाला खरा पण त्या आनंदकारक ठरावास सहस्र प्रकारें विघ्नें येत आहेत. त्या ठरावाची इत्यर्थता कळविते वेळीं लार्ड किम्बरले स्टेट सेक्रेटरी बोलले कीं हिंदुस्थान सरकार हा ठराव कितपत अमलांत आणितां येईल हें सांगतील आणि हिंदुस्थान सरकारास हा ठराव शहाणपणाचा वाटला नाहीं तर तोच जबाब पार्लमेंटच्या सभासदांस सांगण्यात येईल. सारांश, इंडिया सरकारच्या मर्जीवर सिव्हील सरव्हिसच्या प्रश्नाचा निकाल आहे म्हणजे ती सूचना पसार होऊन न झाल्या प्रमाणें तिला महत्व देण्यांत येणार आहे.

सन १८८१ त सिव्हील सरव्हिस कमिशन बसलें त्यांत नेटीवांस ज्या जागा पूर्वीं मोकळ्या होत्या त्या कमी करण्यांत आल्या. परंतु कमिशनच्या रिपार्ट वर अघळ पघळ ठराव करिते वेळीं नवीन जागा मोकळ्या नेटिवा साठीं केल्या असें दिग्दर्शन केलें आणि अखेरीस आमच्या हातच्या जागा मात्र हिराऊन घेतल्या. हिंदुस्थान सरकारचा असा अनुदारपणा, स्वार्थप्राविण्य व मत्सरी कद्रूपणा यांचा विसर सिव्हील सरव्हिसच्या परीक्षे संबंधानें अभिप्राय देते वेळी पडेल असें आह्मास स्वप्नांत देखील वाटणार नाहीं तेव्हां आशा कितपत असणार आहे.

परंतु आमचा समज व आग्रह या प्रसंगीं असा आहे कीं, लोकांनीं हिंदुस्थानभर मोठी चळवळ केली पाहिजे. हिंदुस्थानचे लोकमतानें मि. पाल, सर डब्ल्यू वेडरबर्न, दादाभाई नवरोजी इत्यादी मंडळीस जंगी पाठबळ दिलें पाहिजे. कामन्स सभा सिव्हिल सरव्हीस परीक्षेवरील ठराव हिंदुस्थान सरकारच्या अभिप्रायावर झुगारून देईल तर तसें होऊं नये ह्मणून येथील लोकांनीं या खेपेस मोठी खटपट केलीच पाहिजे.

## हें झालें तरी कसें?

( लिहून आलेला मजकूर )

रा. रा. रंगराव नरसिंह मुधोळकर बी. ए. एल्. एल्. बी. यांचा द्वितीय संबंध आतां बहुतेक जगजाहिर झाला आहे व सर्वांनीं आपआपल्या परीनें त्यावर शेरे ही खरडले. झालें तें सर्व ठीकच झालें. बोलल्या प्रमाणें कृती घडून आली नाहीं ह्मणजे सर्वांनीं बोचून घेणें हें रास्तच आहे. जज्ज साहेबांनीं घालून दिलेल्या उदाहरणाचें अनुकरण फार लवकर व अधिक योग्य रीतीनें जगापुढें आल्यानें सर्वांनां आश्चर्य व खेद होणें बरोबर आहे. या पूर्वीं घडून आलेल्या गोष्टींनीं ज्या प्रमाणें सुधारणेच्या कामाला धक्का पोहोचला त्या प्रमाणेंच किंबहुधा जास्त या गोष्टीनें पोहोचेल. वैरभिकार लिहितात त्या प्रमाणें सुधारणेच्या पक्षाला जे कांहीं थोडे बहुत लोक अजून चिकटून राहिलें आहेत त्यांचा उत्साह या गोष्टी होत असूनही वाढेल तर फार उत्तम होईल. पण तसें होईल कीं नाहीं याची शंका आहे. उलट या गोष्टिमुळें दुसऱ्या पुष्कळ बारिक सारिक सुधारणांनां मात्र व्यत्यय येण्याचा रंग आहे.

रा० रा० मुधोळकरा सारख्या सुधारणे करितां झटणाऱ्या गृहस्थाकडून ही गोष्ट व्हावी ह्मणजे आश्चर्याची गोष्ट ऐकल्या बरोबर हें झालें तरी कसें हा प्रश्न सहजच उभा राहतो व ऐकणाराचा ही गोष्ट खरी न मानण्याकडे सुद्धां कल होतो. रा० रा० मुधोळकर यांनीं या पूर्वीं सुधारणेच्या कामीं बरेच अव्याहत श्रम केले आहेत. आपल्या विचार स्वातंत्र्या करितां त्यांनीं बराच त्रास सोसला व प्रसंगीं बऱ्याच लोकांस नाखुष ही केलें. असें ऐकण्यांत आलें आहे. तेव्हां या संबंधानें इतरांचे खुषी करतां त्यांनीं हा द्वितीय संबंध केला असें संभवत नाहीं. त्यांना स्वतः आपले मता प्रमाणें चालण्याचें धैर्य नसावें हेंही त्यांचे मागील वर्तनावरून संभवत नाहीं. काय असेल तें असो. परंतु अशी गोष्ट घडून येण्याला जीं कारणें झालीं असतील तीं ( जगा पुढें आणण्या सारखीं असल्यास) बाहेर येतील तर बरें.

या व इतर गोष्टिवरून एक ठोकळ सिद्धांत काढतां येईल. विधवापुनर्विवाह व इतर सुधारणा यामध्यें महदंतर आहे व प्रत्येक सुधारणेच्या पक्षाला मिळालेल्या इसमानें प्रसंग पडला तर विधवा पुनर्विवाह केलाच पाहिजे असें नाहीं. उलट असें ह्मणता येईल कीं विधवा पुनर्विवाह प्रत्येकाला करणें शक्य नाहीं. प्रसंग पडला तर विधवा पुनर्विवाह प्रत्येकानें करणें रास्त आहे हा सिद्धांत कितीही व्यापक व बरोबर असला तरी व्यवहारामध्यें त्याप्रमाणें आचरण होत नाहीं हें २५।३० वर्षांचे हकीकतीवरून दिसून येईल. आज पर्यंत विधवा पुनर्विवाह फारच थोडे झाले आहेत, व पुष्कळ सुधारणा अग्रणींनीं प्रसंगीं पाठ दिली आहे. उलट दुसऱ्या सुधारणा. व त्याच झपाट्यानें अंमलांत येत आहेत. उदाहरणार्थ आज काल विवाहाचें वय गेल्या २०।२५ वर्षांपेक्षां बरेच चढत्या प्रमाणांत आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. या वरून असें अनुमान काढितां येईल कीं एकाद्या सुधारकानें विधवा पुनर्विवाह न केला तर त्यांस एकदम दोष न देता त्यांची स्थिति व इतर गोष्टी कडे लक्ष देऊन विधवा पुनर्विवाह त्यांचे संबंधानें शक्य आहे किंवा नाहीं हें प्रत्येकानें बघावें. थोड्या बहुत प्रमाणानें या गोष्टी इतर सुधारणांस ही लागू आहेत पण इतर सुधारणा संबंधानें त्यांना फारच थोडे महत्व दिलें पाहिजे कारण इतर सुधारणा अंमलांत आणण्यास विधवा पुनर्विवाहा सारखी खदला बद्दल करावी लागत नाहीं. विधवा पुनर्विवाह व इतर सुधारणा यांत फारच अंतर आहे व एक न करितां दुसऱ्या गोष्टि करिता येण्या सारख्या आहेत हें सिद्ध आहे.

खरोखर पाहिलें असतां इतर सुधारणा प्रमाणेंच कांहीं यत्ते पर्यंत तरी न पुनर्विवाह होणें आवश्यक आहे. सुधारक असो किंवा कट्टा धर्माभिमानी असो, सुधारणा द्वेष्टा असो किंवा धर्मलंड असो, बालविधवाकडे पाहून वाईट न वाटणारे असे फार थोडे. मग घरांतच अशा बाला जर असल्या तर काळजास घरे पडत असतील यांत काय नवल! परंतु पूर्वापार चालीचा जोर असा कांहीं विलक्षण आहे कीं, आह्मी डोळ्या वर कातडें ओढतो व अतिशय निंद्य अशा कृत्यांना मत देतो. इतकेंच नाहीं तर जर कोणी अशा अबलांना संकटांतून सोडवील तर त्यांस त्रास देण्यास तयार होतो. या पेक्षां सवयीचा जोर जास्त तो काय असणार!! यामुळेंच पुनर्विवाह करण्यास लोक धजत नाहींत. कारण त्यांना लोकांचे पासून शाबासकीचे ऐवजीं त्रास मात्र होतो, शिवाय पुष्कळ सुखास मुकावें लागतें तें वेगळेंच. आणखी पुनर्विवाह करणारा चांगला गबर असलाच पाहिजे. कारण पुनर्विवाहित संततीची व्यवस्था करणें त्यांस फार जाचतें. मनुष्याचा कांहीं जगण्याचा नेम नसल्यामुळें पुनर्विवाहिच्छुला आपल्या पत्नीची चांगली सोय लावणें भाग पडतें या शिवाय दुसऱ्या पुष्कळ अडचणी येतात. या सर्वांचा विचार करितां पुनर्विवाह लावणें हें मोठें जोखमीचें, खर्चीचें व धैर्याचें काम आहे हें कोणीही कबूल करील. ही मोठी दिलगिरीची गोष्ट आहे कीं, पुनर्विवाहा सारख्या चांगल्या व मनांतून पुष्कळांना हव्या असणाऱ्या गोष्टीला इतके अडथळे असावे, परंतु याला कांहीं इलाज नाहीं. आणखी बरेच दिवस हें असेंच चालेल. आमच्या सुधारकांनीं आग्रह धरिला नसतां तर कांहीं यत्ते पर्यंत तरी पुनर्विवाह सशास्त्र आहे किंवा करण्यास फारशी हरकत नाहीं असा ठराव बाहेर आला असता परंतु तसें झालें नाहीं. हें फार वाईट झालें. असो. मुख्य गोष्ट ध्यानांत ठेवण्याची ती ही कीं, पुनर्विवाहा पेक्षां करण्या सारख्या दुसऱ्या पुष्कळ गोष्टी आहेत पुनर्विवाह सर्वांस शक्य नाहीं. व सर्व नवीन गोष्टी जरी सुधारणा शब्दांत मोडतात तरी विधवा पुनर्विवाह व इतर सामाजिक सुधारणेचीं अंगें या मध्यें बराच फरक आहे हें प्रत्येकानें ध्यानांत आणावें. व अमूक एकानें पुनर्विवाह केला नाहीं ह्मणून सुधारकांचें ह्मणणें झूट आहे त्यांत कांहीं अर्थ नाहीं व त्याप्रमाणें कोणी वागण्याचा प्रयत्न करूं नये असें ह्मणत बसूं नये. यावरोबरच सुधारणे खालीं मोडणाऱ्या सर्व गोष्टींचा प्रत्येकानें नीट विचार करून आपल्यास आणता येतील तितक्या गोष्टी अंमलांत आणण्याचा प्रयत्न करावा.

वर दिलेल्या गोष्टीवरून विचार करितां रा० रा० मुधोळकर यांस पुनर्विवाह करण्यास कोणचेही रीतीनें हरकत दिसत नाहीं परंतु हेंच ह्मणणें दुसरे दोन जे द्वितीय संबंध झाले त्यांसंबंधानें ह्मणतां येणार नाहीं. निदान त्यापैकीं एकाचे संबंधानें तरी पुनर्विवाह शक्य होता असें ह्मणता येणार नाही. आतां द्वितीय संबंध झाला तो योग्य आहे किंवा नाहीं हा प्रश्न अलाहिदा राहिला.

या सर्व गोष्टी वऱ्हाड सामाजिक सभा आपल्या वार्षिक बैठकीचे वेळीं पुढें आणील अशी आशा आहे व सभा करणारांनीं आपलें वर्तन चोख ठेविलें आहे किंवा नाहीं इकडे सभेचें लक्ष जाईल अशी तिच्या चालकांनीं व्यवस्था करावी अशी त्यांस सविनय सूचना आहे.

## The Berar Samachar

MONDAY JUNE, 26, 1893

We have been favoured by Rao Sahib Deorao Vinayak with a copy of his opinion he forwarded to the Deputy Commissioner, Akola on the question of assessing newly the free—grazing lands set apart at the last Survey settlement held 30 years back. The learned and judicious opinion of Rao Sahib Deorao speaks for itself and deserves a careful consideration. Before we reproduce it for general information we would however request him to supplement it with a statement of figures upon which he hopes to build a stronghold for his sound and invincible arguments in the letter.

"Nearly $\frac{3}{4}$ of the Berar population is an agricultural population and the number of depending on land is yearly increasing. The last Census report proves this. Berar land under the plough cannot therefore get rest and thus stands in great need of manure. Cowdung manure is the most suitable manure for it and it is in the interest of Government as well as that of the cultivator to have an abundant supply of the same. To make grazing accomodations dearer is, therefore, in my humble opinion not at all desirable. The more the pressure on the grazing facilities the lesser will there be

the agricultural stock. As the Berar Revenue administration does I include in the term cows, buffaloes, sheep, and goats as all of these are for the benefit of the agriculture and agriculturists in general. In this sense I submit the measure is disadvantageous practially. It will not be out of plan here to give the definition put upon the term by the wellknown Thana Forest Commission:—

'That the term agricultural cattle should be interpreted liberally so as to include, in addition to the stock actually needed for field work, a fair proportion of breeding and immature animals, and milch cattle, as also animas owned and kept for domestic use by persons who though not themselves actually holding and cultivating land, render useful service to the village communities and that in fixing such a limit in the Thana and Kolaba districts, if it be hereafter considered necessary, special regard be had to the great value of cowdung as a material for ash manure.'

I submit the measure is unsound and a few of my reasons, in addition to what I have said regarding Berar soil, I give below:—

(1) No British administration in India, as far as I can gather information for, have ever thought of interfering with the recognized immemorial privilege of the villagers to graze their cattle on the avilable waste land of the village free of charge.

(2) Bombay, Madras, North-west Provinces, and the Punjab Government have allotted land specially for free grazing of the Village-cattle and similar allotment had been made in Berar also. Our allotment was however insufficient and was again disproportionately distributed. But scanty as it was it was never thought of putting any assessment on it.

(3) It is a very strong moral if not strictly legal, obligation upon Government to preserve the ancient right of its cultivator enabling him to cultivate his land beneficially to Government and to himself.

(4) Lord Reay at the time of opening the proceedings of Thana Forest Commission said as follows:—

'Agricultural problems have always struck me as peculiarly interesting, and the more one looks into the various agricultural systems of various countries, the more one becomes convinced that over-legislation in agricultural matter is a mistake, and that in the present condition of agricultural science, which is not by any means as far advanced as it ought to be, we must be careful to interfere as little as possible.'

His Lordship also said

'On the grazing question your report will no doubt throw light but meanwhile you may take for granted that it is the determination of Government that wherever free grazing has been lawfully enjoyed it will be contained by giving a full equivalent in all thoses cases where the area hitherto used has been absorbed.'

This assurance of a ruler of a Presidency the revenue system of which is a guide to the Berar system is no doubt encouraging and it will I venture to say, be a great disappointment to the Berar Cultivator if, instead of improving his condition in this respect he is told to give up his free grazing which he has been using from his forefathers' time.

(5) In H. H. the Nizam's Dominions the survey operations have long been commenced and, if I mistake not, the free grazing is being allowed there to the cultivator with morol libeality than what had been done in Berar.

In conclusion I beg to say that the first proposal to levy some grazing tax on non agricultural cattle is not practicable because it is as difficult as undesirable, looking to the present condition of the agriculture to make any distinction between agricultural and non—agricultural cattle; and that the second proposal to assess the present free grazing land and levy the same assessment on the whole village land is contrary to the recognized right of the villagers from the time immemorial and in opposition to the systems in most of the other British administrations in India and also contrary to the assurance given at the former survey and settlement; and I hope you will strongly urge the Local Government to see their way to make enlarged allotments for the purpose of free grazing of the village cattle as from the following figures you will see that Berar allotments are by no means adequate and not evenly distributed:—

For the whole Province in 1891-92 Cattle 25,35,011 Grazing area 7,04,858. For Akola District alone in 1891-92 Cattle 4,04,550 Grazing area 47,123. For Thana District in Bombay Presidency Cattle 3,06,040 Grazing area 6,60,485.

In Thana one cattle hts more than 2 ac res to graze on freely, whereas in Berar, every 7 cattle have the same area (2 acres) to graze on, but in the Akola District particularly you will see that 9 cattle have to depend on only one acre of free grazing"

## वऱ्हाड.

कुमार श्री हरबानजी हे असिस्टंट कमिशनर वर्ग १ चे झाल्यामुळें त्यांच्या वर्ग १ च्या जागीं मि.सिम्पसन यांची बदली झाली.

आणि शेवटच्या वर्ग ३ च्या असिस्टंट कमिशनच्या जागीं हैदराबाद कांटिनजंट फौजेंतील लेफटेनन्ट डी. ओ. मारिस यांस नेमिलें आणि त्या अन्वयें हे नवे गृहस्थ उमरावतीस येऊन हजर झाले.

रा. रा. वासुदेव सदाशिव विसोळकर एक्स्ट्रा आसि. कमिशनर, हैदराबाद यांस चालूं महिन्यापासून सहा महिन्यांची फर्लो रजा मिळाली आहे.

आह्मास कळविण्यास आनंद वाटतो कीं रा. रा. नारायण रावजी शिंदे नायब तहशीलदार, पुसद यांची बडतर्फी रद्द करून त्यांस पुन्हा कायम करण्यांत आलें. अपील केलें नसतें तर नोकरीला मुकलेच होते. खालील अधिकाऱ्याचा कोता व उतावळा विचार मोठा घातुक!

मि. डेव्हीस स्पेशल असिस्टंट कमिशनर, वाशीम यांनीं गेल्या १२ वे तारखे पासून पेनशन घेतलें. हे मोठे चांगले अधिकारी होते आणि यांची कारकीर्द लोकांच्या स्मरणांत पुष्कळ दिवस राहील.

मि. आर. आवर्ड सेशन जज्ज यांनीं या आठवड्यांत सेशन कोर्ट आकोल्यास भरविलें होतें. या खेपेस तीनच खटले असल्यामुळें गेल्या शुक्रवारींच सर्व काम आटोपल्या वरून साहेब बहादूर उमरावतीस गेले. तीन मोकद्दम्यांचा निकाल झाला तो येणेप्रमाणें:—

(१) पिंपळगांव येथील गोबऱ्या नावाचा इसम दारू पिऊन तर्र झाला होता आणि त्या वेडांत रागवल्यामुळें त्यानें हातांतली मोगरी एका वंजाऱ्याच्या अंगावर फेकली. वंजारी त्या प्रहारानें घायाळ होऊन पुढें चार दिवसांनीं मरण पावला खून नव्हे असा सदोष मनुष्यवध केल्याचे शाबीत झाल्या वरून गोबऱ्यास सहा महिन्यांची सजा झाली.

(२) दुसरा खटला तरोडे तालुका खामगांव या गांवचा होता. या गांवचा वतनदार पाटील चांगला डोळस नव्हता ह्मणून त्यानें जानराव नांवाचा मुखत्यार पाटील सरकारी कामानिमित्त नेमला होता. मुखत्याराचीं वर्षें संपण्याचा सुमार आला तेव्हां पाटीलकी वतनदाराकडे परत द्यावी किंवा मुखत्यारपणाची मुदत लांबवावी हा प्रश्न निघाला. अशा समयास वतनदार पाटलाचा घातपात होऊन तो मरण पावला आणि खुनाचा आरोप मुखत्यार जानराव व त्याचा दोस्त इरभान व दुसरा एक इसम यांजवर आला होता. आरोपीवर खून शाबीत होण्या सारखा पुरावा सविस्तर, संगतवार व खात्री लायक मिळाला नाहीं ह्मणून आरोपी दोषमुक्त झाले. आरोपीवर संशय असा आला होता कीं त्यांनीं वतनदार पाटच्या घरीं जाऊन त्याला रात्री चावडीवर बोलावलें. तो कांकूं करीत होता तरी सर्व्हेकडील साहेबाला उद्या सरबराई आहे व भजन आहे असें त्याच्या आईला कळवून त्यांनीं त्याला घराबाहेर काढलें आणि गांवाबाहेर नेऊन त्याला ठार मारून त्याचा मुडदा लांबवर विहिरींत फेकून दिला. ही निंद्य व अघोर हत्या आरोपींनीं पाटीलकीच्या अभिलाषानें केली असा आरोप ठेवण्यांत आला होता. पण निकाला अंतीं पुरावा उपयोगी व पुरेसा ठरला नाहीं आणि खटला खोटा रचला असावा अशी गोष्ट दिसून पडली. आरोपीं तर्फे वकील रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई हे होते.

शिरसोळी तालुके अकोट येथील जानजी नांवच्या एका इसमानें आपल्या शेजाऱ्याची एक मुलगी दागदागिने घालून नेहमी प्रमाणें आपल्या कडे येतांना पाहिली. दागिने पाहतांच त्याच्या मनांत पापबुद्धि आली. तिला त्यानें आपले शेतांत नेलें आणि दागिने काढून घेऊन विहिरीत लोटली. खुनाचा थांग लागण्यास कारण चमत्कारिक झालें. त्या मुलीच्या आईबापांनीं तिच्या साठी पुष्कळ शोध केला व अखेर ते निराश झाले. परंतु थोडक्यांतच एका रात्रीं ती मुलगी आईच्या स्वप्नांत गेली आणि तिनें अमूक विहिरीत पडल्याचें सांगितलें. त्या दृष्टान्तांवरून तपास केला, तेव्हां विहिरींत तिचें प्रेत सांपडलें. राखणास भय्यन होता त्यानें त्या मुलीला विहिरींत लोटतांना दुरून शौचविधी करीत असतां पाहिलें होतें पण जानजी अर्धे दागिने देणार आहे असें पाहून तो गूपचूप बसला. परंतु शोधाच्या वेळीं तो सर्व कबूल झाला आणि जानजी वर पूर्ण अपराध बरकड पुराव्यानें शाबीत झाला आणि त्यास फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली.

नोटीस

लक्ष्मी मर्द जवजे मारुती रहाणार बाळापूर इसः—

नोटीशीचें उत्तर तुह्मी वऱ्हाडसमाचार अंक २४ यांत ता० १२।६।९३ इ० ची नोटीस आह्मास दिली ती पावली त्याचें उत्तर —तूं माझी लग्नाची बायको असून तूं रोगग्रस्त झालीस करितां मी दुसरी गंधर्वांची बायको केली असून तिचा व तुझा बेबनाव बिलकुल नाहीं. तुझा व तिला मी वागविण्याला समर्थ आहे, व अद्यापि वागविण्याला कबूल आहे. असें असून आमचा बाळापुरांत जातीसंबंधानें तंटा आहे. आमचे विरुद्ध पक्षाचे जे लोक आहेत त्या लोकांस तूं मिळाफी होऊन आमच्याशी तंटा करू लागलीस व निराळी राहिलीस यावरून नोटीशीनें कळवितों कीं, मी तुजला माझे घरा जवळ एक घर रहाण्यास देतों, व अन्न खर्च व कपडा रिती प्रमाणे जो लागेल तो देण्यांस तयार आहे. फक्त आमचे विरुद्ध पक्षाचे जे लोक आहेत यांजकडेस जाणें येण्याचें बंद करावें. त्यांचे मता प्रमाणें विनाकारण नोटीस देऊन प्रसिद्ध करणें बरावर नाहीं. तुह्मी जर विरुद्ध पक्षाकडेस गेले असें आह्मास समजले तर तुमचे अन्न वस्त्र बंद करूं कारण तुह्मी आमचे आज्ञेप्रमाणें वागत नाहीं असें समजलें जाईल. कळावे. ही नोटीस दिली ता० २३।६।९३ सही

मारुतीसा भवानसा रंगारी दुकान बाळापूर दस्तुर खुद.

नोटीस

मे० हसन वलद इसमालजी मोमीन मुसलमान राहणार बाळापूर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं पेठ बाळापूर पैकीं वजीराबाद येथील आमचे दुकान तुह्मास भाड्यानें दिलें आहे. त्याचें भाडें आमचे सांगण्यावरून आमचा मुलगा नामें गोविंदा यांस तुह्मी देत आहा. आतां आमचे दुकान आह्मास पाहिजे. करितां आतां ही नोटीस पावल्या तारखे पासून ८ आठ दिवसाचे आंत खालीं करून आमचे ताब्यांत द्यावें. न दिल्यास रिती प्रमाणें तजवीज करून ताब्यांत घेण्यांत येईल व खर्च तुह्मास द्यावा लागेल मग तुमची कोणतेही प्रकारें तकरार ऐकली जाणार नाहीं. ह्मणून दिली नोटीस ता० २४ माहे जून सन १८९३ इ० (सही)

गनुलाल चुनीलाल पांडे रहाणार बाळापूर द० खु०

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस कळविण्या करितां खालीं सही करणारे इसम याजकडूनः—

कळविण्यांत येतें कीं, पेठ बाळापूर येथील आमची स्वसंपादीत स्थावर इस्टेट आहे ती आमचे उभयतांचे मालकीची आहे. आह्मा दोघां बंधु शिवाय कोणास विकण्यास अगर गहाण ठेवण्यास हक्क नाही व गनुलाल पांडे याचीं मुलें दोन गोविंदा व पन्नु हे आपले बापा पासून पांच ५ वर्षें झालीं विभक्त आहेत. त्या उभयतांचा कोणतेही प्रकारचा हक्क नाहीं. आह्मा दोघा शिवाय तिसरे मनुष्यास कोणचेही प्रकारची आमचे जिनगीची व्यवस्था करण्याची परवानगी नाहीं. कोणीही आमचे मुला जवळून अगर वारसा जवळून गहाण अगर खरेदी वगैरे घेतल्यास तो व्यवहार निरर्थक आहे. ह्मणून दिली जाहिरात ता० २४ माहे जून सन १८९३ इ० सही

गनुलाल चुनीलाल पांडे लक्ष्मणदास चुन्नीलाल पांडे रहाणार बाळापूर द. खु.

## वर्तमानसार.

धुळ्यास एकटें दुकटें हवा खाण्यास जाणें देखील धोक्याचें झालें आहे. गेल्याच्या मागच्या आठवड्यांत एक गृहस्थ एकटे हवा खाण्यास गेले असतां त्यांस गांवानजीकच चोरांनीं लुटलें!

इंग्लंडामध्यें हिंदुस्थाना संबंधानें जो खर्च होतो त्याबद्दल यासाठीं १,८०,००,००० पौंड पाठवायाचे ठरलें आहे; पैकीं गेल्या ३ तारखेपर्यंत ३५,२४,८०० पौंड रवाना करण्यांत आले.

जर्मनींतील एक एमिल शौर्सो नांवाचा २४ वर्षांचा गारवड्याचे खेळ करणारा मनुष्य आहे. त्यानें लांकडाचे गेळपावरून म्यन्चेस्टरपासून लंडनपर्यंत प्रवास करण्याचें काम अंगावर घेऊन तें तडीस नेलें. त्याच्या बरोबर बायसिकलवर बसून दोन साक्षीदार प्रवास करीत होते. हा प्रवास २९० मैलांहून अधिक होता.

नांदूरपाड्याकडेस श्री० पंतसचीव यांचे हद्दींत हत्यारबंद लोकांचा बराच पुंडावा माजला असल्याचें कळतें दरवडे पडून खून देखील झाले आहेत.

हैद्राबादच्या राज्यकारभारांत यूरोपियन लोकांना घुसडण्याची जारीनें खटपट चालली आहे.

निजाम सरकारच्या राजवाड्यांतून ११,००० रुपये किंमतीचें जवाहीर चोरीस गेल्याचें समजतें.

खेड ता० पैकीं पिंपरगण येथें ८।१० दरोडखोरांनीं हत्यारबंद होऊन दंगा सुरू केला. तेव्हां पोलिसचे लोक तो दंगा मोडण्यास गेले तों एका पोलिस शिपायाला तरवारीचा वार लागून त्याचा खवाटा उतरला गेला. पोलिसाकडील एका गोळीनें दरोडखोरांतील एक इसम मरण पावला. व दोन इसम पकडण्यांत आले आहेत.

क० त०

सातारा— येथील प्रसिद्ध विद्वान वे० शा० सं० अनंताचार्य गजेंद्रगडकर हे कांहीं दिवस आजारी पडून ते गेले सोमवारीं दुपारीं परलोकवासी झाले. हें कळविण्यास आम्हांस फार दुःख होत आहे. यांचें वय पंचावन वर्षांचें होतें.

येत्या जुलई महिन्यांत मिसर देशचे खेदीव तुर्कस्तानच्या सुलतानास भेटण्यासाठीं कानस्तांतिनोपल येथें जाणार आहेत. सुलतान साहेबांची भेट झाल्यावर पुढें तसेंच स्वित्सरलंडास जाऊन परत मिसर देशांत येणार. ह्या भेटीचें कारण कांहीं गूढ असावें.

जीव घेणारी पैज — अग्जबर्ग (जर्मनी) येथील राजविद्यालयांत एक आजारी आला आहे. ह्या मनुष्याचें वय ४० वर्षांचें आहे. तिकडे हजल ह्मणून एक फळ आहे त्याच्या २५० कोया खाईल त्यास मी पांच शिलिंग देईन असें त्याच्या समवयस्कांपैकीं एकजण ह्मणाला त्यावरून पांच शिलिंग देशील तर मी तितक्या कोया खाईन अशी या धनरट मनुष्यानें पैज मारली, व ती प्रमाणें १५० कोया खाल्ल्या खाल्ल्यावर पोटास तडस लागून तो अगदीं व्याकूळ झाला. तेव्हां त्यास इस्पितळांत नेलें तेथल्या कुशल वैद्यांनीं त्यापोटांतल्या २०९ कोया काढल्या.

बाह्य देशच्या मनीआर्डरी— तारीख ९ जून सन १८९३ पासून १ शि. २ पेन्सचा एक रुपया ह्या भावानें बाह्य देशीं मनी आरडरी दिल्या जातील असें पोस्ट खात्यानें ठरविलें आहे.

शु० सू०

पुणे जिल्ह्यांतल्या खेड तालुक्यांत पोलिस दरोडखोर, यांचा एक सामना होऊन त्यांत एक दरोडखोर ठार झाला व एक पोलिस शिपायी घायाळ झाला. त्या जिल्ह्याचे पोलिस सुपरिन्टेन्डेन्ट त्या कामाच्या तपासास गेले आहेत.

विनायक अली नावाचे हैदराबाचे कोणी नवाब हे ता० ११ रोजीं पुण्यास गाडीत अपघात होऊन ठार झाले त्यांचे प्रेत हैद्राबादेस नेणार.

मुंबईइलाख्यांतला लष्करी कामदार क्या प्रेसटन हा उतकामंद येथें शिकारीस गेला असतां पाण्यांत बुडून मेला.

मुंबईच्या चेंबरसभेच्या तर्फेनें माकडोनल यांस कायदेकौंसिलचे मेंम्बर नेमलें असें गेल्या सरकारी ग्याझिटांत प्रसिद्ध झाले आहे.

बंगालइलाख्यांतील छावण्यांतल्या गटारांची वगैरे स्वच्छता करण्याकरतां या वर्षी हिंदुस्थान सरकारानें ९१,००० रुपये दिले आहेत.

१८९१ सालांत सगळ्या हिंदुस्थानांत रेलवेचे जे अपघात झाले त्यांत १४५ माणसे मेली असून १८९२ सालीं ५२४ मेलीं व १८९१ त १०८४ माणसें घायाळ झालीं असून १८९२त ९३० झालीं.

फेरोजपूर जिल्ह्यांत टोळधाड सुरूं झाली आहे त्यांस मारण्याचा सरकारचा उद्योग चालूं आहे.

काश्मीर येथें पटकीचा वाखा सुरु झाला आहे.

काश्मीरचे राज्य हिंदुचे आहे, पण त्या सरकारचा लष्करी सेक्रेटरी साहेब आहे. गायकवाड, निझाम, वगैरेचा प्रकारही कांहींसा असाच आहे बिचाऱ्या नेटिवांस नेटिवसंस्थानांतहीं थारा नाहीं असें लवकरच होणार आहे.

दायाव पांडिला. हे लोक हजारा लोकांस मिळालें नाहींत. व त्याणीं त्यांस मिळू नये. ह्मणून अमिराचा यत्न चालू आहे हल्लीं जे हजारा लोक दंगखोरझालें आहेत त्यांची संख्या २०,००० आहे.

कोकनचे कांहीं यात्रे करूस हजारी लोकांनीं मारले व लुटले.

बंडखोर हजारा लोकांवर बडी स्वारी करण्याची अमिराची सर्व तयारी झाली फार मोठी फौज त्या लोकांवर नेण्याचा अमिराचा बेत आहे.

गिलजित, चित्रळ व चिला या ठिकाणीं इंग्रजसरकारची हल्लीं जी फौज आहे ती आणखी कांहीं मुदत तशीच कायम राहण्याचें ठरले आहे असें सांगतात.

केरो येथील ६०० कैदी कामावर काढले असतां त्यांणी पळून जाण्याचा यत्न केला व त्या लढालढींत ३९ कैदी ठार झालें तरी ११ फरारी झालेच.

ठा० अ०

आंबाला येथून नुक्तीच एक टोळधाड गेली. ह्याची स्वारी इकडे न फिरें!

कानपुरास एक साखरेचा कारखाना नवीन झाला आहे. त्याचें भांडवल ६ लक्षांचें आहे. चिकागोच्या प्रदर्शनांत हिंदुस्थानच्या जिनसांची मोठी प्रशंसा होत आहे असें ह्मणतात.

विजापूरच्या गुड्सक्लार्कीनें ५०० रुपयाची रेलवेची ठेव दाबल्यामुळें त्याजवर खटला होऊन त्यास सेशन कमिट केलें आहे.

रशियाची सरहद्द ठरवून घेण्याकरितां रशियन सरकाराकडून एक कमिशनर आला आहे!

पु. वै.

नागरमोथ्याच्या दोन कांड्या आणि रिठ्याच्या दोन फळांची साल अशी दोन जिनसा कुटून त्याची बारीक पूड करावी, व ती वेड्यांतून साप चावलेल्या मनुष्यास खावयास द्यावी; ह्मणजे शरीराच्या सर्व द्वारांतून रेच, वांती वगैरे स्राव होऊन विष उतरतें.

कसने मेवळी इलाखे जहागीर राजा नानकवस या गांवीं हणमंता आवटी या नांवाचा एक कोळी जातीचा इसम आज सहामहिन्यापासून आजू बाजूच्या पांच सहा कोसांत बकरी, मेंढरें हे प्राणी मृत झालेले घेऊन त्यांचेबद्दल दुसरें जिवंत प्राणी तितक्याच किंमतीचे देत असतो. यामुळें आसपासच्या गांवेच लोकांनीं मेलेली बकरी, मेंढरे आणून देऊन त्याचे ऐवजीं जिवंत घेऊन जाण्याचा सपाटा चालविला आहे यांत सदर कोळ्यास काय नफा असेल ता असो.

व्यापारी.

नोटीस

रा. रा. मोहनसिंग वल्लद गोविंदसिंग जमादार रहाणार अकोलें ताजनापेठ यांसः—

नोटीस देणार मलु वल्लद रामजी म्हाली व मुलगा बालकिसन वल्लद मलु रहाणार धोतरडी तालुका अकोलें नोटीशीनें असें कळवितों कीं, अदमासें तीन वर्षें झालीं असावीत. तुह्मी माझ्या बापाच्या नावानें तुमचे बापाच्या नांवचें खात्याचें शेत तेलखेडे तालुके आकोलें. सरवे नंबर ३० याचे सरकार देणें ३१।४।३ एकतीस रुपये चार आणे तीन पै आकाराचे माझ्या बापाचें नांवानीं रुपये २५० अजमासें अडीचशेस खातें करून दिलें व सदरहू शेताचें खातें तुह्मी आकोल्यास येऊन मेहर० तहशिलदार साहेब यांचे समोर माझे बापाचें नांवानीं करून दिलें. करून दिलेल्या शेताचे रुपये एकदम एक मुठीनें न घेतां तीन चार वेळां मिळून द्यावेत असा करार केला होता त्या प्रमाणें सन १८९१ सालीं जून महिन्यांत सदरहू शेताचें खातें बदल रुपये ७५ पाऊणशे दिले. त्याची पावती तीकीट लावून दिली आहे. नंतर सन १८९२ सालीं एप्रील महिन्यांत पुन्हा ११० रुपये दिले त्याची पावती आपण दिली आहे. परंतु त्यांत रुपये (४५) पावल्या बदल तर भरपाई आहे. परंतु व्याजाचे रुपये मागील ६५ वगैरे मजकूर लिहून २२५ घेणें आह्मा कडून राहिले आहेत. वगैरे मजकूर मोठ्या खुबीचा लिहिला आहे. आह्मी अडाणी लोक लिहितां वाचतां येत नाहीं. भरंवशावर सर्व कामें करितों. अशा बरोबर तुह्मी उत्तम प्रकारची कारवाई पावतीमध्यें केली आहे. आतां तुह्मास ह्या नोटीशीनें असें कळवितों कीं, तुह्मी आह्मास सदरहू शेताचे खातें करून दिले त्याजबद्दल रुपये २५० देणेंचे. त्यांत तुह्मास आज पावेतों रुपये पावले ते (३८५) रु० याचा तपशील. एकदा ७५ व दुसऱ्यादा ११०, व तिसऱ्यादा २०० रु० धनेश्वर शिवचरण ब्राह्मण राहणार धोतरडी यांस तुह्मी आह्मास खातें करून दिलेले सदरहू शेत या पैकीं निमे शेत मी खातें करून दिले. व निमे खातें करून दिले त्याचे रुपये २०० दोनशे मी तुम्हास त्या वेळीं आणून दिले रुपये दोनशे दिले यास अजमासें १॥ दीड महिना झाला. रुपये ७५ पाऊणशे बदल पावती आहे. व रु० ११० दिले त्याची पावती तुह्मी दिली आहे त्यांत ४५ खातें बदल व मागील व्याज ६५ ह्मणून लाविलें. व ही पावती तुह्मी कपटानें व मजला बुडविण्याच्या इराद्यानें लिहून दिली आहे हे उघड उघड पावतीच सांगतें व रु. २०० दिले त्याची पावती ह्यावेळ पर्यंत तुह्मांस मागतो आहे. परंतु आज देऊं उद्या देऊं असें सांगून आज सुमारें १५ दिवस झालें पावती न देतां उलट मजला मारहाण शिवीगाळ केली. फार उत्तम केले आतां तुह्माकडे माझे एकंदर रु. आज पावेतों पोंच १८५ रु. तुमचे खातेबद्दल रु. अदमासे २५० वजाजातां बाकी रु. ७५ तुह्मी आह्मास फसवून घेतले आहेत तर ही नोटीस पावल्यापासून चार दिवसांत रु. ७५ आमचे आह्मास देऊन निकाल करावा. असें झालें नाहींतर रीती प्रमाणें काम चालून रु. ह्या नोटीशीच्या खर्चा सुद्धां भरून घेईन. आतां तुमचे आम्ही कांहीं देणें नाहीं. तुम्हो विनाकारण फिर्याद वगैरे केल्यास त्याजबद्दलचा जबाबदार मी कोणत्याही प्रकारोंने नाहीं तुम्हास आम्ही कसे रुपये दिले याजबदल रिती प्रमाणें पुरावा मजपाशी आहे वेळ ज्यावेळीं पुरावा करण्याची आपण आणाल त्यावेळीं मी तयार आहे. म्हणून दिली नोटीस ता० १९ माहे जून सन १८९३ इ०

सही

मलु वल्लद रामजी म्हाली व बालकिसन वल्लद मलु म्हाली राहणार धोतरडी द० खु

नोटीस.

सारजी मर्द भगु व शामजी बेरड रहाणार जस्त गांव तालुके अकोट जिल्हे अकोलें या उभयतांसः—

नोटीस देणार भगु वल्लद विष्णाजी मामनकार जात कुणबी रहाणार सिरसोली तालुका अकोट. नोटीशीनें असें कळवितों कीं तूं आज सुमारें दोन वर्षांपूर्वी दिपवाळी करितां आपले बापाचे घरीं गेलीस त्या वेळ पासून आज पावेतों मी स्वतः तीन चार वेळ तुजला घेणें करितां आलो परंतु तूं आली नाहींस. तुझा बाप मात्र सांगतो कीं आणून घालवितो परंतु अद्याप पावेतों माझे तू आली नाहींस म्हणून तुजला व तुझे बापाला असें कळविलें जातें कीं, नोटीस पावले पासून आठ दिवसांत माझे घरीं तूं यावेस अगर तुझे बापानें आणून घालवावें असें झाले नाहींतर तुजला ताब्यांत घेण्या करितां रितिप्रमाणें फिर्याद करून या नोटीशीचे खर्चासह सर्व नुकसान भरून घेतली जाईल म्हणून दिली नोटीस सही ता० २२—६—९३ इ०

सही

भगु वा॥ विष्णाजी मामनकार द० खु.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.